RNI No. MAHBIL/2012/48433
www.dgps.maharashtra.gov.in.

महाराष्ट्र शासन राजपत्र

भाग एक – पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - १४, अंक - ३१] गुरुवार ते बुधवार, जुलै ३१ ते ऑगस्ट ६, २०२५ / श्रावण ९ - १५, शके १९४७ [पृष्ठे-१७५

प्राधिकृत प्रकाशन

शासकीय/संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

नगर विकास विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
चौथा मजला, मुख्य इमारत,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक : १८ जुलै २०२५

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६

अधिसूचना

क्रमांक टीपीएस-२१२४/१३१४/प्र.क्र.५२/२०२५/वि.यो.मंजुरी/नवि-१३.— ज्याअर्थी, कुरुंदवाड नगरपरिषद, जिल्हा कोल्हापूर (यात यापुढे "उक्त नियोजन प्राधिकरण" असे संबोधिलेले आहे) हद्दीतील क्षेत्राकरिता (यात यापुढे "उक्त क्षेत्र" असे संबोधिलेले आहे) उक्त नियोजन प्राधिकरणाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम ३७ वा) (यात यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधिलेले आहे) चे कलम २३ *(१)* सहकलम ३८ *(१)* अन्वयेच्या तरतुदीनुसार व त्यासह कलम २३ अन्वयेच्या तरतुदीनुसार ठराव क्र. ६२, दिनांक २ मार्च २०२१ अन्वये कुरुंदवाड नगरपरिषदेची प्रारूप विकास योजना (दुसरी सुधारित) (यात यापुढे "उक्त प्रारूप विकास योजना" असे संबोधिलेले आहे) तयार करणेचा इरादा जाहीर केला असून त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक--पुणे विभागीय पुरवणीमध्ये, जून २४-३०, २०२१, पृष्ठ २१ वर प्रसिद्ध झाली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाच्या कलम २५ अन्वये तिच्या हद्दीतील उक्त क्षेत्राचे सर्वेक्षण करून, उक्त प्रारूप विकास योजना तयार करून उक्त अधिनियमाच्या कलम २६ *(१)* अन्वये प्रसिद्ध करण्यास ठराव क्र. २१०, दिनांक १७ मार्च २०२३ अन्वये मान्यता दिली असून त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक--पुणे विभागीय पुरवणीमध्ये मे १८-२४, २०२३, पृष्ठ ११ वर सूचना / हरकती मागविण्यासाठी प्रसिद्ध झाली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रारूप विकास योजनेवर विहित मुदतीत आलेल्या हरकती व सूचनांचा विचार करून उक्त अधिनियमाच्या कलम २८ *(२)* नुसार स्थापन केलेल्या नियोजन समितीने तिचा अहवाल उक्त नियोजन प्राधिकरणाकडे सादर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने नियोजन समितीचा अहवाल विचारात घेऊन उक्त अधिनियमाच्या कलम २८ *(४)* अन्वये उक्त प्रारूप विकास योजनेत काही बदल करून ठराव क्र. २८०, दिनांक ८ ऑगस्ट २०२३ अन्वये काही बदल प्रसिद्ध करण्याचे ठरवून, या बदलांसह (यात यापुढे "उक्त फेरबदल" असे संबोधिलेले आहे) उक्त प्रारूप विकास योजना, उक्त अधिनियमाच्या कलम २८ *(४)* अन्वये जनतेच्या अवलोकनार्थ प्रसिद्ध केली असून, त्याबाबतची सूचना भाग एक--पुणे विभागीय पुरवणीमध्ये सप्टेंबर ७-१३, पृष्ठे २०-२१ वर प्रसिद्ध झाली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमातील कलम ३० मधील उपकलम *(१)* मधील तरतुदीनुसार उक्त नियोजन प्राधिकरण यांनी उक्त प्रारूप विकास योजना उक्त फेरबदलांसह शासनास पत्र क्र. १३२१, दिनांक २० सप्टेंबर २०२३ अन्वये सादर केली आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना (सुधारणा) अध्यादेश, २०२४ चे कलम ३ नुसार मूळ अधिनियमाच्या कलम ३१ चे उपकलम *(१) (दोन्ही)* मधील सुधारित परंतुकानुसारच्या तरतुदीनुसारच्या कालावधीत, उक्त प्रारूप विकास योजनेबाबत शासनाने निर्णय घेण्याबाबत नमूद आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३१ *(१)* मधील तरतुदीनुसार उक्त विकास योजनेबाबत आवश्यक त्या चौकशीनंतर, तसेच संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी सल्ला मसलत केल्यानंतर उक्त प्रारूप विकास योजनेसोबत जोडलेल्या 'परिशिष्ट-अ'मधील (SM-०१) बदलांसह व 'परिशिष्ट-ब'मधील (EP-०१ ते EP-०६) सारभूत फ़ेरबदल वगळून भागश: मंजूर करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे.

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३१ *(१)* मधील तरतुदीनुसार, तसेच इतर अनुषंगिक शक्तींचा वापर करून शासन खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे :-

अ) कुरुंदवाड नगरपरिषदेच्या दुसऱ्या सुधारित भागश: क्षेत्राच्या विकास योजनेस, सोबत जोडलेल्या 'परिशिष्ट-अ'मधील (SM-०१) बदलांसह व 'परिशिष्ट-ब'मधील सारभूत स्वरूपाचे फेरबदल (EP-०१ ते EP-०६) वगळून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

ब) कुरुंदवाड नगरपरिषदेच्या दुसऱ्या सुधारित भागश: क्षेत्राच्या विकास योजनेस मंजुरी देणेस महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१ *(१)* मधील तरतुदीनुसार दिनांक १८ जुलै २०२५ पर्यंत मुदतवाढ मंजूर करणेत येत आहे.

क) कुरुंदवाड नगरपरिषदेची भागश: क्षेत्राची दुसरी सुधारित मंजूर विकास योजना, या अधिसूचनेन्वये मंजूर झालेली असून सदर अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसानंतर अमलात येईल.

टीप :--

(१) उक्त मंजूर विकास योजनेत, जी आरक्षणे / नामाभिधान / नामनिर्देशने सोबतच्या 'परिशिष्ट-अ' व 'परिशिष्ट-ब' मध्ये नमूद नाहीत, अशी आरक्षणे त्या-त्या प्रयोजनासाठी दर्शविण्यात आल्यानुसार मंजूर करणेत येत आहेत.

(२) शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टीपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८/कलम-३७ *(१कक) (ग)* व कलम २० *(४)*/नवि-१३, दिनांक २ डिसेंबर २०२० अन्वये मंजूर केलेली एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, त्यानंतर वेळोवेळीच्या बदलांसह उक्त क्षेत्राकरिता लागू राहील.

(३) विकास योजना अहवालात नमूद केलेले आरक्षणाचे क्षेत्र अंदाजे असून, अंतिम विकास योजनेत नकाशावर दर्शविलेल्या आरक्षणाच्या हद्दीनुसार जागेवर प्रत्यक्ष मोजणीनुसारचे क्षेत्र अंतिम राहील.

(४) उपरोक्त कुरुंदवाड नगर परिषदेची भागश: क्षेत्राची मंजूर दुसरी सुधारित अंतिम विकास योजना, जनतेच्या अवलोकनार्थ कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत मुख्याधिकारी, कुरुंदवाड नगरपरिषद, कुरुंदवाड, जिल्हा कोल्हापूर यांच्या कार्यालयात सदर विकास योजना अमलात आल्याच्या दिनांकापासून एक महिन्यापर्यंत उपलब्ध करणेत येत आहे.

परिशिष्ट - अ

विकास योजना - कुरुंदवाड नगरपरिषद, कुरुंदवाड (दुसरी सुधारित)

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१ *(१)* अन्वये शासनाने मंजूर केलेले फेरबदल (शासन अधिसूचना क्र. टीपीएस-२१२४/१३१४/प्र.क्र.५२/२०२५/वि.यो.मंजुरी/नवि-१३, दिनांक १८ जुलै २०२५ सोबतचे सहपत्र)

Sr. No.	Modification No.	Proposals of Draft Development Plan published under Section 26 of the MR and TP Act, 1966.	Proposals of Draft Development Plan submitted under Section 30 of the MR and TP Act, 1966	Modification Sanctioned by the Government while sanctioning the Draft Development Plan under Section 31 of the MR and TP Act, 1966.
1	2	3	4	5
1.	SM-1	Site No. 25, 'Extn. to Cremation Ground.	**M-1** Site No. 25, 'Extn. to Cremation Ground' is proposed to be re-designated as Site No. 25 (Burial Ground).	Site No. 25, 'Extn. to Cremation Ground is re-designated as 'Site No. 25, Burial Ground'.

सदरची अधिसूचना महाराष्ट्र शासनाचे www.maharashtra.gov.in (कायदे / नियम) या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे नावाने व आदेशाने,

प्रणव कर्पे,
अवर सचिव,
महाराष्ट्र शासन.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai - 400 032

Dated 18th July 2025

The Maharashtra Regional and Town Planning Act, 1966

NOTIFICATION

No.TPS-2124/1314/CR-52/2025/DP.Sanction/UD-13.— Whereas, the Kurundwad Municipal Council (District Kolhapur) being the Planning Authority within its jurisdiction (hereinafter referred to as "the said Planning Authority") *vide* its Resolution No. 62, dated 2nd March 2021 declared its intention under Section 23 *(1)*, read with Section 38 *(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to "the said Act") to prepare Draft Development Plan (Second Revised) for the Kurundwad Municipal Council (hereinafter referred to as "the said area") within the limits of the Kurundwad Municipal Council (hereinafter referred to as "the said Draft Development Plan") and notice of such declaration was published at Official Gazette, Part One--Pune Divisional Supplement, June 24 - 30, 2021, Page 21 ;

and whereas, the said Planning Authority after carrying out Survey of the entire land of the said Area within its jurisdiction as required under Section 25 of the said Act and *vide* its Resolution No. 210, dated 17th March 2023 decided to publish a notice in the Official Gazette, dated 18-24 May, 2023 on Page 11 for inviting objections or suggestions in respect of the said Draft Development Plan prepared by it under sub-section *(1)* of Section 26 of the said Act ;

and whereas, after considering the suggestions and objections received in respect of the Draft Development Plan, the Planning Committee, set up under Section 28 *(2)* of the said Act, submitted it's report to the said Planning Authority ;

and whereas, the said Planning Authority *vide* its Resolution No. 280, dated 8th August 2023 made certain Modifications in the published Draft Development Plan under sub-section *(4)* of Section 28 of the said Act and published the Draft Development Plan so modified (hereinafter referred to as the "said Modifications") for information of the public under sub-section *(4)* of Section 28 of the said Act by a notice published in the Official Gazette, Part One--Pune Divisional Supplement, September 7-13, 2023 on Pages 20 to 21 ;

and whereas, in accordance with the provisions of sub-section *(1)* of Section 30 of the said Act, the said Planning Authority has submitted the said Draft Development Plan *vide* its Marathi Letter No. 1321, dated 20th September 2023 to the Government of Maharashtra for its sanction ;

and whereas, within the period provided for in the amended proviso to sub-section *(1) (two)* of Section 31 of the principal Act under Section 3 of the Maharashtra Regional Planning and Town Planning (Amendment) Ordinance, 2024, decision about the said Draft Development Plan has to be taken by the Government ;

and whereas, in accordance with sub-section *(1)* of Section 31 of the said Act, after making necessary enquiries and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, the State Government is of the opinion that the said Draft Development Plan should be sanctioned partly, along with the modifications shown in SCHEDULE-A (as SM-01), excluding the substantial Modifications (as EP-01 To EP-06) as specified in SCHEDULE-B appended hereto.

Now therefore, in exercise of the powers conferred by sub-section *(1)* of Section 31 of the Said Act and of all other powers enabling it on that behalf, the Government of Maharashtra hereby :–

a. Government of Maharashtra accords sanction to the Second Revised Development Plan of Kurundwad Municipal Council partly, along with the Modifications as specified in Schedule-A (as SM-01), excluding the substantial Modifications (as EP-01 To EP-06) as specified in Schedule-B appended Notice No. TPS-2124/1314/CR-52/2025/E.P. Publish/UD-13, dated 18th July 2025.

b. Extends the Period prescribed under amended proviso to sub-section *(1) (two)* of Section 31 of the principal Act under Section 3 of the Maharashtra Regional Planning and Town Planning (Amendment) Ordinance, 2024 for part area of the Second Revised Development Plan of Kurundwad Municipal Council up to and inclusive of dated 18th July 2025.

c. The Second Revised sanctioned Development Plan of Kurundwad Municipal Council has been approved through this Notification, and the said Notification shall come into effect after 30 days from the date of its publication in the Official Gazette.

Note :–

(1) The Reservations / allocations / designations which do not appear in the Schedule-A and Schedule-B appended hereto, are hereby sanctioned for the respective purposes as designated in the Second Revised sanctioned Development Plan of Kurundwad Municipal Council.

(2) The Unified Development Control and Promotion Regulations sanctioned *vide* Notification No. TPS-1818/CR-236/18/Section 37 *(1AA)(c)* and Section 20 *(4)*/UD-13, dated 2nd December 2020, as amended from time to time, shall be applicable to the said Area.

(3) Areas of reserved sites mentioned in the report of the Development Plan are approximate and subject to actual measurement on site as per boundaries shown on the Final Development Plan.

(4) The aforesaid partly sanctioned Second Revised Final Development Plan of Kurundwad Municipal Council sanctioned by the State Government *vide* this Notification shall be kept open for inspection by the general public during office hours on all working days for a period of one month from the date of coming into force of this Notification, in the Office of the Chief Officer, Kurundwad Municipal Council, Kurundwad, District Kolhapur.

SCHEDULE - A

Development Plan Kurundwad Municipal Council, Kurundwad (Second Revised)

Modifications Sanctioned by the Government under Section 31 *(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Accompaniment to the Government Notification No. TPS-2124/1341/CR-52/2025/ DP.-Sanction/UD-13, dated 18th July 2025)

Sr. No.	Modi-fication No.	Proposals of Draft Development Plan published under Section 26 of the MR and TP Act, 1966.	Proposals of Draft Development Plan submitted under Section 30 of the MR and TP Act, 1966	Modification Sanctioned by the Government while sanctioning the Draft Development Plan under Section 31 of the MR and TP Act, 1966.
1	2	3	4	5
1.	SM-1	Site No. 25, 'Extn. to Cremation Ground.	**M-1** Site No. 25, 'Extn. to Cremation Ground' is proposed to re-designated as Site No. 25 (Burial Ground).	Site No. 25, 'Extn. to Cremation Ground is re-designated as 'Site No. 25, Burial Ground'.

This Notification shall also be made available on the Government web-site **www.maharashtra.gov.in** (Acts and Rules).

By Order and in the name of Governor of Maharashtra,

PRANAV KARPE,
Under Secretary to Government.

नगर विकास विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
चौथा मजला, मुख्य इमारत,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १८ जुलै २०२५

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६

अधिसूचना

क्रमांक टीपीएस-२१२४/१३१४/प्र.क्र.५२/२०२५/ई.पी.प्रसिद्धी/नवि-१३.— ज्याअर्थी, कुरुंदवाड नगरपरिषद, जिल्हा कोल्हापूर (यात यापुढे "उक्त नियोजन प्राधिकरण" असे संबोधिलेले आहे) हद्दीतील क्षेत्राकरिता (यात यापुढे "उक्त क्षेत्र" असे संबोधिलेले आहे) उक्त नियोजन प्राधिकरणाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना, अधिनियम १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम ३७ वा) (यात यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधिलेले आहे) चे कलम २३ *(१)* सहकलम ३८ *(१)* अन्वयेच्या तरतुदीनुसार व त्यासह कलम २३ अन्वयेच्या तरतुदीनुसार ठराव क्र. ६२, दिनांक २ मार्च २०२१ अन्वये कुरुंदवाड नगरपरिषदेची प्रारूप विकास योजना (दुसरी सुधारित) (यात यापुढे "उक्त प्रारूप विकास योजना" असे संबोधिलेले आहे) तयार करणेचा इरादा जाहीर केला असून त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक--पुणे विभागीय पुरवणीमध्ये जून २४-३०, २०२१, पृष्ठ २१ वर प्रसिद्ध झाली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाच्या कलम २५ अन्वये तिच्या हद्दीतील उक्त क्षेत्राचे सर्वेक्षण करून, उक्त प्रारूप विकास योजना तयार करून उक्त अधिनियमाच्या कलम २६ *(१)* अन्वये प्रसिद्ध करण्यास ठराव क्र. २१०, दिनांक १७ मार्च २०२३ अन्वये मान्यता दिली असून त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक--पुणे विभागीय पुरवणीमध्ये मे १८-२४, २०२३, पृष्ठ ११ वर सूचना / हरकती मागविण्यासाठी प्रसिद्ध झाली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रारूप विकास योजनेवर विहित मुदतीत आलेल्या हरकती व सूचनांचा विचार करून उक्त अधिनियमाच्या कलम २८ *(२)* नुसार स्थापन केलेल्या नियोजन समितीने तिचा अहवाल उक्त नियोजन प्राधिकरणाकडे सादर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने नियोजन समितीचा अहवाल विचारात घेऊन उक्त अधिनियमाच्या कलम २८ *(४)* अन्वये उक्त प्रारूप विकास योजनेत काही बदल करून ठराव क्र. २८०. दिनांक ८ ऑगस्ट २०२३ अन्वये काही बदल प्रसिद्ध करण्याचे ठरवून, या बदलांसह (यात यापुढे "उक्त फेरबदल" असे संबोधिलेले आहे) उक्त प्रारूप विकास योजना, उक्त अधिनियमाच्या कलम २८ *(४)* अन्वये जनतेच्या अवलोकनार्थ प्रसिद्ध केली असून, त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक--पुणे विभागीय पुरवणीमध्ये सप्टेंबर ७-१३, २०२३, पृष्ठे २०-२१ वर प्रसिद्ध झाली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमातील कलम ३० मधील उपकलम *(१)* मधील तरतुदीनुसार उक्त नियोजन प्राधिकरण यांनी उक्त प्रारूप विकास योजना उक्त फेरबदलांसह शासनास पत्र क्र. १३२१, दिनांक २० सप्टेंबर २०२३ अन्वये सादर केली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३१ *(१)* मधील तरतुदीनुसार उक्त विकास योजनेबाबत आवश्यक त्या चौकशीनंतर, तसेच संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी सल्लामसलत केल्यानंतर उक्त अधिनियमाच्या कलम ३१ *(१)* मधील तरतुदीनुसार, उक्त प्रारूप विकास योजनेस (दुसरी सुधारित), शासन अधिसूचना क्र. टीपीएस-२१२४/१३१४/प्र.क्र.५२/२०२५/वि.यो. मंजुरी/नवि-१३, दिनांक १८ जुलै २०२५ अन्वये 'परिशिष्ट-अ' मधील (SM-०१) बदलांसह व सूचना क्र. टीपीएस-२१२४/१३१४/प्र.क्र.५२/२०२५/ई.पी.प्रसिद्धी/नवि-१३, दिनांक १८ जुलै २०२५ अन्वये त्यासोबतच्या 'परिशिष्ट-ब' मधील (EP-०१ ते EP-०६) सारभूत स्वरूपाचे फ़ेरबदल वगळून भागश: मंजुरी देण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त 'परिशिष्ट-ब' मधील सारभूत स्वरूपाचे फेरबदल उक्त मंजूर विकास योजनेतून वगळले असून सदर वगळलेले सारभूत स्वरूपाचे फेरबदल विकास योजना नकाशावर (ई.पी.-०१ ते ई.पी.-०६) दर्शविले आहेत.

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३१ *(१)* मधील, तसेच या अनुषंगिक शासनास असलेल्या शक्तींचा वापर करून शासन खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे :--

अ) सोबत जोडलेल्या 'परिशिष्ट-ब' मधील सारभूत स्वरूपाचे फेरबदलांबाबत प्रस्तुत सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत जनतेकडून सूचना / हरकती मागविण्यात येत आहेत.

ब) सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे यांची उक्त अधिनियमाच्या कलम ३१ *(२)* अन्वये उपरोक्त "अ" मध्ये नमूद, विहित मुदतीत प्राप्त हरकती / सूचनांबाबत सुनावणी देणेसाठी व त्याबाबतचा अहवाल शासनास पुढील कार्यवाहीसाठी सादर करणेसाठी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

सदर सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या विहित कालमर्यादेत सोबतच्या 'परिशिष्ट-ब' मधील सारभूत फेरबदलानुषंगाने प्राप्त होणाऱ्या हरकती / सूचना सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे, कक्ष क्र. २१२, दुसरा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, विधानभवना समोर, पुणे-४११ ००१ यांचेकडे स्वीकारून त्या विचारात घेण्यात येतील.

सदर सूचना त्यासोबतच्या 'परिशिष्ट-ब' सह आणि प्रस्तावित सारभूत बदल दर्शविणाऱ्या नकाशासह जनतेच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत व दिवशी उपलब्ध करणेत येत आहेत.

१. सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, २१२, ए विंग, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे.

२. सहायक संचालक, नगर रचना, कोल्हापूर शाखा, मध्यवर्ती इमारत, कसबा-बावडा, कोल्हापूर.

३. मुख्याधिकारी, कुरुंदवाड नगरपरिषद, कुरुंदवाड, जिल्हा कोल्हापूर, पिन-४१६ १०६.

परिशिष्ट - ब

विकास योजना - कुरुंदवाड नगरपरिषद, कुरुंदवाड (दुसरी सुधारित)

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१ *(१)* अन्वये शासनाने प्रसिद्ध केलेले सारभूत स्वरूपाचे फेरबदल

(शासन सूचना क्र. टीपीएस-२१२४/१३१४/प्र.क्र.५२/२०२५/ई.पी.प्रसिद्धी/नवि-१३, दिनांक १८ जुलै २०२५ सोबतचे सहपत्र)

Sr. No.	Excluded Part	Proposals of Draft Development Plan published under Section 26 of the MR and TP Act, 1966.	Proposals of Draft Development Plan submitted under Section 30 of the MR and TP Act, 1966	Substantial Modification published by the Government under Section 31 *(1)*
1	2	3	4	5
1.	EP-1	C.T.S. No. 3269-A, Public/Semi-public Zone.	**M-2** Public / Semi-Public Zone shown on C.T.S. No. 3269-A is proposed to be deleted and land thereunder is proposed to be included in Residential Zone.	Public / Semi-public Zone shown on C.T.S. No. 3269-A is proposed to be deleted and land thereunder is proposed to be included in Residential Zone as shown on Plan.
2.	EP-2	C.T.S. No. 3268, Public/Semi-public zone.	**M-3** Public / Semi-Public Zone shown on C.T.S. No. 3268 is proposed to be deleted and land thereunder is proposed to be included in Residential Zone.	Public / Semi-public Zone shown on C.T.S. No. 3268 is proposed to be deleted and land thereunder is proposed to be included in Residential Zone as shown on Plan.
3.	EP-3	Residential Zone.	Residential Zone.	New alignment of 12 mtrs. wide North-South DP Road passing through Gat Nos. 327, 328. 329 and C.T.S. No. 1940, 2074 is to be proposed, as shown on Plan.

परिशिष्ट - ब--*चालू*

1	2	3	4	5
4.	EP-4	i) Gat No.236 (P), 'Reservation No. 16, Municipal Purpose and 'PSP Zone'. ii) Gat No.125, 'Residential Zone'.	i) Gat No. 236 (P), Reservation No. 16, 'Municipal Purpose' and 'PSP Zone'. ii) Gat No. 125, 'Residential Zone'.	i) 'Reservation No. 16, 'Municipal Purpose' from Gat No. 236 (P.) is proposed to be shifted in Gat No.125 as shown on Plan. ii) Accordingly remaining PSP Zone shown in Gat No. 236 (P.) is proposed to be deleted and land thereunder is proposed to be included in Residential Zone as shown on Plan.
5.	EP-5	Gat Nos. 268 and 269, 12 mtrs. wide DP road.	Gat Nos. 268 and 269, 12 mtrs. wide DP road.	The alignment of 12 mtrs. wide proposed DP road passing through Gat Nos. 268 and 269 is proposed to be realigned, as shown on plan.
6.	EP-6	i) Gat No. 124, Reservation No. 4, 'Sewage Treatment Plant'. ii) Gat No. 376, Reservation No. 3, 'Playground'.	i) Gat No. 124, Reservation No. 4, 'Sewage Treatment Plant'. ii) Gat No. 376, Reservation No. 3, 'Playground'.	i) Reservation No. 4, 'Sewage Treatment Plant' is proposed to be shifted on Government land in Gat No. 376 (P.) and land thereunder is included in NDZ as shown on Plan. ii) Boundary and area of the Reservation No.3, 'Playground' is adjusted accordingly as shown on Plan.

सदरची अधिसूचना महाराष्ट्र शासनाचे www.maharashtra.gov.in (कायदे / नियम) या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे नावाने व आदेशाने,

प्रणव कर्पे,
अवर सचिव,
महाराष्ट्र शासन.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai - 400 032

Dated 18th July 2025

The Maharashtra Regional and Town Planning Act, 1966

NOTIFICATION

No. TPS-2124/1314/CR-52/2025/EP.Publish/UD-13.— Whereas, the Kurundwad Municipal Council (District Kolhapur) being the Planning Authority within its jurisdiction (hereinafter referred to as "the said Planning Authority"), *vide* its Resolution No. 62, dated 2nd March 2021 declared its intention under Section 23 *(1)*, read with Section 38 *(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to "the said Act") to prepare Draft Development Plan (Second Revised) for the area (hereinafter referred to as "the said area") within the limits of the Kurundwad Municipal Council (hereinafter referred to as "the said Draft Development Plan") and notice of such declaration was published in the Official Gazette, Part One--Pune Divisional Supplement, June 24 - 30, 2021 on Page 21 ;

and whereas, the said Planning Authority after carrying out survey of the entire land of the said Area within its jurisdiction as required under Section 25 of the said Act and *vide* its Resolution No. 210, dated 17th March 2023 decided to publish a notice in the Official Gazette, Part One--Pune Divisional Supplement, May 18-24, 2023 on Page 11 for inviting objections or suggestions in respect of the said Draft Development Plan prepared by it under sub-section *(1)* of Section 26 of the said Act ;

and whereas, after considering the suggestions and objections received in respect of the Draft Development Plan, the Planning Committee, set up under Section 28 *(2)* of the said Act, submitted it's report to the said Planning Authority ;

and whereas, the said Planning Authority *vide* its Resolution No. 280, dated 8th August 2023 made certain Modifications in the published Draft Development Plan under sub-section *(4)* of Section 28 of the said Act and published the Draft Development Plan so modified (hereinafter referred to as the "said Modifications") for information of the public under sub-section *(4)* of Section 28 of the said Act by a notice published in the Official Gazette, Part One--Pune Divisional Supplement, September 7-13, 2023 on Pages 20 to 21 ;

and whereas, in accordance with the provisions of sub-section *(1)* of Section 30 of the said Act, the said Planning Authority has submitted the said Draft Development Plan *vide* its Marathi Letter No. 1321, dated 20th September 2023 to the Government of Maharashtra for its sanction ;

and whereas, in accordance with sub-section *(1)* of Section 31 of the said Act, after making necessary enquiries and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the State Government *vide* Urban Development Department's Notification No. TPS-2124/1314/CR-52/2025/ DP-sanction/UD-13, dated 18th July 2025, has sanctioned a part of the said Draft Development Plan (Second Revised), as specified in SCHEDULE-A (as SM-01) appended to it, excluding the substantial Modifications of (EP-01 to EP- 06) as specified in SCHEDULE-B appended with this Notice bearing No.TPS-2124/ 1314/CR-52/2025/E.P.Publish/UD-13, dated 18th July 2025 ;

and whereas, the substantial Modifications proposed by the Government as specified in SCHEDULE-B are excluded from the aforesaid Sanctioned Plan and are shown on the plan and marked as Excluded Part (as EP-01 to EP-06).

Now, therefore, in exercise of the powers conferred under Section 31 *(1)* of the said Act and all other powers enabling it on that behalf, the Government of Maharashtra hereby :–

a) Gives notice inviting suggestions and objections from any person in respect of the proposed substantial Modifications as specified in the SCHEDULE-B appended hereto, within a period of one month from the date of publication of this notice in the Official Gazette.

b) Appoints the Joint Director of Town Planning, Pune Division, Pune as the "Officer" under Section 31 *(2)* of the said Act, to hear all the persons filing suggestions and objections as stated in (a) above, within the stipulated period and to submit his report thereupon to the Government for further necessary action.

Only the suggestions or objections regarding substantial Modifications mentioned in SCHEDULE-B that may be received by the Joint Director of Town Planning, Pune Division, Pune, having his office at 212, A-Wing, New Administrative Building, Opposite Council Hall, Pune within the stipulated period of one month from the date of publication of this Notice in the Official Gazette, shall be considered.

Copy of this Notice along with SCHEDULE-B and the plan showing the proposed substantial Modifications shall be made available for inspection to the general public at the following offices during office hours on all working days.

(i) The Joint Director of Town Planning, Pune Division, 212, A-Wing. New Administrative Building, Opposite Council Hall, Pune.

(ii) The Assistant Director of Town Planning, Kolhapur Branch, Kolhapur, Central Building, Kasba-Bawda, Kolhapur-6.

(iii) The Chief Officer, Kurundwad Municipal Council, Kurundwad, District Kolhapur, Pin-416 106.

SCHEDULE - B

Development Plan Kurundwad Municipal Council, Kurundwad (Second Revised)

Substantial Modifications proposed by the Government under Section 31 *(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

(Accompaniment to the Government Notice No. TPS-2124/1341/CR-52/2025/EP.-Publish/UD-13, dated : 18th July 2025)

Sr. No.	Excluded Part	Proposals of Draft Development Plan published under Section 26 of the of MR and TP Act, 1966.	Proposals of Draft Development Plan submitted under Section 30 of the MR and TP Act, 1966	Substantial Modification published by the Government under Section 31 *(1)*
1	2	3	4	5
1.	EP-1	C.T.S. No. 3269-A, Public/Semi-public Zone.	**M-2** Public / Semi-Public Zone shown on C.T.S. No. 3269-A is proposed to be deleted and land thereunder is proposed to be included in Residential Zone.	Public / Semi-public Zone shown on C.T.S. No. 3269-A is proposed to be deleted and land thereunder is proposed to be included in Residential Zone as shown on Plan.
2.	EP-2	C.T.S. No. 3268, Public/Semi-public Zone.	**M-3** Public / Semi-Public Zone shown on C.T.S. No. 3268 is proposed to be deleted and land thereunder is proposed to be included in Residential Zone.	Public / Semi-public Zone shown on C.T.S. No. 3268 is proposed to be deleted and land thereunder is proposed to be included in Residential Zone as shown on Plan.
3.	EP-3	Residential Zone.	Residential Zone.	New alignment of 12 mtrs. wide North-South DP Road passing through Gat Nos. 327, 328. 329 and C.T.S. No. 1940, 2074 is to be proposed, as shown on Plan.
4.	EP-4	i) Gat No.236 (P.), 'Reservation No. 16, Municipal Purpose and 'PSP Zone'.	i) Gat No. 236 (P), Reservation No. 16, 'Municipal Purpose' and 'PSP Zone'.	i) 'Reservation No. 16, 'Municipal Purpose' from Gat No. 236 (P.) is proposed to be shifted in Gat No.125 as shown on Plan.
		ii) Gat No.125, 'Residential Zone'.	ii) Gat No. 125, 'Residential Zone'.	ii) Accordingly remaining PSP Zone shown in Gat No. 236 (P.) is proposed to be deleted and land thereunder is proposed to be included in Residential Zone as shown on Plan.
5.	EP-5	Gat Nos. 268 and 269, 12 mtrs. wide DP road.	Gat Nos. 268 and 269, 12 mtrs. wide DP road.	The alignment of 12 mtrs. wide proposed DP road passing through Gat Nos. 268 and 269 is proposed to be realigned, as shown on plan.
6.	EP-6	i) Gat No. 124, Reservation No. 4, 'Sewage Treatment Plant'.	i) Gat No. 124, Reservation No. 4, 'Sewage Treatment Plant'.	i) Reservation No. 4, 'Sewage Treatment Plant' is proposed to be shifted on Government land in Gat No. 376 (P.) and land thereunder is included in NDZ as shown on Plan.

SCHEDULE - B--*Contd.*

1	2	3	4	5
		ii) Gat No. 376, Reservation No. 3, 'Playground'.	ii) Gat No. 376, Reservation No. 3, 'Playground'.	ii) Boundary and area of the Reservation No.3, 'Playground' is adjusted accordingly as shown on Plan.

This Notice shall also be made available on the Government web-site **www.maharashtra.gov.in**

By Order and in the name of the Governor of Maharashtra,

PRANAV KARPE,
Under Secretary to Government.

नगर विकास विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
चौथा मजला, मुख्य इमारत,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक : १८ जुलै २०२५

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६

अधिसूचना

क्रमांक टीपीएस-१८१९/११४/प्र.क्र.५७/२०१९/नवि-१३.— ज्याअर्थी, शासन नगर विकास विभागाने, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७) (यात यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधिले आहे) चे कलम ३१ *(१)* अन्वये, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीची (यात यापुढे "उक्त नियोजन प्राधिकरण" असे संबोधिले आहे) विकास योजना, अधिसूचना क्र. टीपीएस-१८१५/२०१२/प्र.क्र.८४/१५/वि.यो.मंजुरी/नवि-१३, दिनांक ६ जानेवारी २०१७ अन्वये मंजूर केलेली आहे, तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना, शासन अधिसूचना क्र. टीपीएस-१८१५/२०१२/प्र.क्र.८४/ १५/ई.पी.मंजुरी/नवि-१३, दिनांक ३ ऑक्टोबर २०१८ नुसार मंजूर झालेली आहे (यात यापुढे "उक्त विकास योजना" आणि "उक्त अधिसूचना" असे संबोधिले आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये, मौजे ताथवडे येथील सर्व्हे क्र. ४१/१-अ (यात यापुढे "उक्त जमिनी" असे संबोधिले आहे) या जागेवर २४ मी. व १८ मी. रुंद विकास योजना रस्त्याची आखणी प्रस्तावित आहे (यात यापुढे "उक्त आरक्षण" असे संबोधिले आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने त्यांच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ४७२. दिनांक २० नोव्हेंबर २०१९ अन्वये, उक्त जमिनींवरील २४ मी. व १८ मी. रुंद विकास योजना रस्त्याच्या आखणीमध्ये फेरबदल करण्याकरिता उक्त अधिनियमाचे कलम ३७ *(१)* अन्वयेचा फेरबदल प्रस्ताव, सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करून शासनाच्या मान्यतेसाठी सादर केला आहे (यात यापुढे "उक्त फेरबदल प्रस्ताव" असे संबोधिले आहे.) ;

आणि ज्याअर्थी, शासनाने आवश्यक ती चौकशी केल्यानंतर व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी सल्लामसलत केल्यानंतर उक्त फेरबदलाचा प्रस्ताव, अटींसह मंजूर करणे योग्य होईल, असे शासनाचे मत झाले आहे.

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७ पोट-कलम *(२)* अन्वये व त्या अनुषंगाने प्राप्त असलेल्या इतर अधिकारांचा वापर करून उक्त विकास योजनेतील उक्त फेरबदल प्रस्तावास शासन मंजुरी देत आहे.

उक्त विकास योजना मंजुरीच्या अधिसूचनांच्या फेरबदल सूचीतील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नव्या नोंदीचा समावेश करण्यात येत आहे.

"नोंद"

"मौजे ताथवडे येथील सर्व्हे क्र. ४१/१-अ या जागेवरील प्रस्तावित २४ मी. व १८ मी. रुंद विकास योजना रस्त्याबाबत आखणीचे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने सादर केलेल्या प्रस्तावास खालील अटीस अधीन राहून सोबतच्या भाग नकाशावर दर्शविल्याप्रमाणे फेरबदल करण्यात येत आहे."

अटी :-- सदर फेरबदलांतर्गत २४ मी. व १८ मी. रुंदीच्या रस्त्याने तयार होणाऱ्या जंक्शनच्या ठिकाणी सदर रस्त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना वाहतूक सुलभरीत्या होण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेने जंक्शनच्या रस्त्याची गोलाई (Corner Rounding) सुयोग्यरीत्या करणे आवश्यक राहील.

सदर फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा क्र. टीपीएस-१८१९/११४/प्र.क्र.५७/२०१९/नवि-१३ जनतेच्या अवलोकनार्थ आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, जिल्हा पुणे यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत एक महिन्याच्या कालावधीसाठी उपलब्ध असेल.

सदर अधिसूचना शासनाच्या www.maharashtra.gov.in (कायदे / नियम) या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे नावाने व आदेशाने,

प्रणव कर्पे,
अवर सचिव,
महाराष्ट्र शासन.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai - 400 032

Dated 18th July 2025

The Maharashtra Regional and Town Planning Act, 1966

NOTIFICATION

No.TPS-1819/114/CR-57/2019/UD-13.— Whereas, the Government in Urban Development Department under Section 31 *(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") has sanctioned Development Plan of Pimpri-Chinchwad Municipal Corporation (hereinafter referred to as "the said Planning Authority") *vide* Notification No. TPS-1815/2012/CR-84/15/D.P.Sanction/UD-13, dated 6th January 2017 and sanctioned the Development Plan of Excluded Part *vide* Notification No. TPS-1815/2012/CR-84/15/E.P.sanction/ UD-13, dated 3rd October 2018 (hereinafter referred to as "the said Development Plan" and "the said Notifications") ;

and whereas, as per the said Development Plan, alignment of 24 mtrs. and 18 mtrs. wide DP road (hereinafter referred to as "the said Reservation") is proposed on land bearing Survey No. 41/1-A of Village Tathawade is proposed (hereinafter referred to as "the said Land") ;

and whereas, the said Planning Authority, through Resolution No. 472, dated 20th November 2019 of its General Body Meeting, decided to modify the proposed alignment of 24 mtrs. and 18 mtrs. wide DP road and after completing all statutory procedures under Section 37 *(1)* of the said Act the Modification proposal has been submitted for the approval of the Government (hereinafter referred to as the "said Modification Proposal") ;

and whereas, after making necessary enquiries and consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government is of opinion that the proposed Modification needs to be sanctioned with condition.

Now therefore, in accordance with sub-section *(2)* of Section 37 of the said Act and by exercising the associated powers conferred therein, the Government hereby approves the proposed Modification in the said Development Plan.

A new entry is being added after the last entry in the list of Modifications to the Notification sanctioning the said Development Plan.

"ENTRY"

"As per proposal submitted by Pimpri-Chinchwad Municipal Corporation, the aligment of proposed 24 mtrs. and 18 mtrs. wide DP road, from land bearing Survey No. 41/1-A, Mauje Tathwade is modified, as shown on plan subject to following condition."

Condition :- "While implementing the 24 mtrs. and 18 mtrs. wide roads on ground, the Municipal Corporation shall ensure appropriate corner rounding at the junction formed by these roads under this modification, for smooth traffic movement."

A copy of the Part Plan No.TPS-1819/114/CR-57/2019/UD-13 showing the aforesaid sanctioned Modification shall be available in the office of the Commissioner, Pimpri-Chinchwad Municipal Corporation, Pimpri during office hours on all working days for inspection of public for a period of one month.

This Notification shall also be published on the Govt. website **www.maharashtra.gov.in** (Acts and Rules).

By Order and in the name of the Governor of Maharashtra,

PRANAV KARPE,
Under Secretary to Government.

संचालक, नगर रचना यांजकडून

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६

आदेश

क्रमांक वि.यो.इचलकरंजी/मुदतवाढ/कलम-३०/टीपीव्ही-१/३८३८/२०२५.— ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७ वा) (यात यापुढे "उक्त अधिनियम" असे निर्देशिले आहे) च्या कलम २६ *(१)* मधील तरतुदीनुसार इचलकरंजी महानगरपालिका (यात यापुढे "उक्त महानगरपालिका" असे निर्देशिले आहे) हद्दीची प्रारूप विकास योजना तयार करून त्यासंबंधीची सूचना उक्त महानगरपालिकेने उक्त अधिनियमाच्या कलम २६ *(१)* चे तरतुदीन्वये महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-पुणे विभागीय पुरवणीमध्ये दिनांक १५ ते २१ फेब्रुवारी, २०२४ रोजी प्रसिद्ध केली आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रारूप विकास योजना उक्त अधिनियमाचे कलम २६ *(१)* चे तरतुदीन्वये प्रसिद्ध केल्यानंतर उक्त अधिनियमाच्या कलम ३० चे तरतुदीन्वये शासनास मंजुरीस्तव सादर करण्यासाठी मूळ मुदत १२ महिने व कलम १४८-अ नुसार आचारसंहिता कालावधी वगळता, दिनांक १९ जून २०२५ पावेतो आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त महानगरपालिकेने त्यांचेकडील पत्र क्र. आ.का./८१/२०२५, दिनांक १३ जून २०२५ अन्वये अधिनियमाच्या कलम ३० *(१)* मधील तरतुदींनुसार प्रारूप विकास योजना, शासनास मंजुरीस्तव सादर करण्यासाठी दिनांक १९ जून २०२५ पासून ते दिनांक १८ डिसेंबर २०२५ पर्यंतची, ६ महिन्यांची मुदतवाढ, पत्रात नमूद कारणास्तव, मंजूर होण्यास विनंती केलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त महानगरपालिकेने पत्रात नमूद केलेली कारणमिमांसा विचारात घेता, दिनांक १९ जून २०२५ पासून ते दिनांक १८ डिसेंबर २०२५ पर्यंतची मुदतवाढ मंजूर करणे आवश्यक असल्याचे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे.

त्याअर्थी, आता शासन अधिसूचना नगर विकास विभाग क्र. टीपीएस-१८१३/३२११/प्र.क्र.५०८/नवि-१३, दिनांक १ डिसेंबर २०१६ अन्वये प्रदत्त केलेल्या शक्तीचा वापर करून संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे उक्त अधिनियमाच्या कलम ३० *(१)* चे तरतुदीनुसार उक्त प्रारूप विकास योजना शासनास मंजुरीस्तव सादर करण्यासाठी दिनांक १८ डिसेंबर २०२५ पर्यंत हा दिवस धरून त्या दिवसापर्यंत मुदत वाढवित आहेत.

डॉ. प्रतिभा भदाणे,
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे, २७ जून २०२५.

BY DIRECTOR OF TOWN PLANNING

Maharashtra Regional and Town Planning Act, 1966

ORDER

No. D.P.Ichalkaranji/Sec.30/Extn./TPV-1/3838/2025.— Whereas, in accordance with the provisions of Section 26 *(1)* of the Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. 37 of 1966) (hereinafter referred to as the “said Act”), the Ichalkaranji Municipal Corporation (hereinafter referred to as the “said Municipal Corporation”) has prepared a Draft Development Plan for the area and

the said Municipal Corporation has published a Notification in the Maharashtra Government Gazette, Part One-Pune Divisional Supplement, February 15 - 21, 2024 under the provisions of Section 26 *(1)* of the said Act ;

and whereas, after the publication of the Draft Development Plan under the provisions of Section 26 *(1)* of the said Act, the original period for submission to the Government for approval under the provisions of Section 30 of the said Act is 12 months and excluding the period of conduct as per Section 148 A, it is dated 19th June 2025 ;

and whereas, the said Municipal Corporation *vide* its Letter No. A.K./81/2025, dated 13th June 2025 has requested for an extension of 6 months from dated 19th June 2025 to 18th December 2025 for submission of Draft Development Plan to the Government for approval, for the reasons mentioned in the letter ;

and whereas, considering the reasons mentioned in the letter by the said Municipal Corporation, the Director, Town Planning, Maharashtra State, Pune is of the opinion that it is necessary to grant an extension from dated 19th June 2025 to 18th December 2025 ;

Accordingly, in exercise of the powers conferred by the Government Notification Urban Development Department No. TPS-1813/3211/Pr.No.508/Navi-13, dated 1st December 2016, the Director, Urban Planning, Maharashtra State, Pune, in terms of the provisions of Section 30 *(1)* of the said Act, hereby extends the time limit for submission of the said Draft Development Plan to the Government for approval up to and including dated 18th December 2025.

DR. PRATIBHA BHADANE,
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

Pune, 27th June 2025.

प्र. संचालक, नगर रचना यांजकडून

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६

अधिसूचना

क्रमांक प्रा.यो.पुणे/वाघोली-मांजरी खु./ए.न.व.प्र./ॲशडॅन/टीपीव्ही-१/-४१२४/२०२५.— ज्याअर्थी, पुणे प्रदेशाची प्रादेशिक योजना (यात यापुढे जिचा उल्लेख "उक्त प्रादेशिक योजना" असा करण्यात आला आहे) महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८९५/२२७/प्र.क्र.२६/९५/नवि-१३, दिनांक २५ नोव्हेंबर १९९७ (यात यापुढे जिचा उल्लेख "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५ *(१)* (यात यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आलेला आहे) चे तरतुदीन्वये विकास नियंत्रण नियमावलीसह मंजूर केली असून, ती दिनांक १० फेब्रुवारी १९९८ पासून अमलात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २० चे पोट-कलम *(४)* मधील तरतुदीनुसार शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टीपीएस-१८०४/पुणे प्रा.यो.विनिनि/नवि-१३, दिनांक १६ नोव्हेंबर २००५ आणि पूरकपत्र क्र. टीपीएस-१८०४/पुणे प्रा.यो.विनिनि/नवि-१३/पूरकपत्र, दिनांक ६ जानेवारी २००६ द्वारे उक्त प्रादेशिक योजनेच्या क्षेत्रात उक्त प्रादेशिक योजनेकरिता लागू असलेली मंजूर विकास नियंत्रण नियमावली सुधारित करून विशेष नगर वसाहतीच्या विकसनासाठीची नियमावली अंतर्भूत केली आहे व ती वेळोवेळी सुधारित करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, २०१६ मधील कलम ३ चे उपकलम *(१)* च्या तरतुदीमधील अधिकाराचा वापर करून शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. पीआरडी-३३१६/प्र.क्र.५४/नवि-७, दिनांक ११ जुलै २०१६ अन्वये उक्त प्रादेशिक योजनेतील महानगर क्षेत्रासाठी विशेष करून त्या अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचित नमूद केलेल्या क्षेत्राकरिता पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची स्थापना केलेली आहे (यात यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त विकास प्राधिकरण" असा करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाने त्यांचेकडील शासन अधिसूचना क्र. टीपीएस-१८१७/प्र.क्र.१७३/१७/नवि-१३, दिनांक १८ जानेवारी २०१८ अन्वये उक्त विकास प्राधिकरणाची, उक्त अधिनियमाचे कलम ४० *(१)* चे तरतुदीन्वये विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून उक्त महानगर क्षेत्रासाठी नियुक्ती केलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, एल.के. डेव्हलपर्स यांनी मौजे मांजरी खुर्द व वाघोली, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील सुमारे ४०.०९६४ हे. या क्षेत्राच्या जमिनींवरील प्रस्तावित केलेल्या विशेष नगर वसाहत प्रकल्पास शासनाच्या नगर विकास विभागाने शासन अधिसूचना क्र. टीपीएस-१८०७/२४५/ प्र.क्र. ६४१/०७/नवि-१३, दिनांक ४ एप्रिल २००८ अन्वये व त्यानंतर शासनाच्या नगर विकास विभागाने पूरकपत्र येथील क्र. टीपीएस-१८०७/ २४५/प्र.क्र.६४१/०७/नवि-१३, दिनाक ४ डिसेंबर २००८ रोजी मौजे मांजरी खुर्द येथील १.२५५ हे. क्षेत्र उक्त अधिसूचित क्षेत्रात समाविष्ट करून एकूण सुमारे ४१.३५१४ हे. क्षेत्र विशेष नगर वसाहत प्रकल्प क्षेत्र म्हणून अधिसूचित करून स्थानीय मंजुरी देण्यात आली आहे (यात यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिसूचित विशेष नगर वसाहत प्रकल्प" असा करण्यात आला आहे.) ;

आणि ज्याअर्थी, केंद्र शासनाकडून दिनांक ९ एप्रिल २०१० रोजीचे प्रमाणपत्रानुसार एल.के. डेव्हलपर्स या कंपनीचे नाव कुल डेव्हलपर्स प्रा.लि., असे बदलण्यात आले आहे व त्यानंतर केंद्र शासनाच्या दिनांक २१ मे २०१८ रोजीचे प्रमाणपत्रानुसार कुल डेव्हलपर्स प्रा.लि., या कंपनीचे नाव ॲशडॅन डेव्हलपर्स प्रा. लि., असे झालेले आहे व त्यानुसार उक्त क्षेत्र विहितरीत्या ॲशडॅन डेव्हलपर्स प्रा. लि. (यात यापुढे "उक्त प्रकल्प प्रवर्तक" असा करण्यात आलेला आहे) यांचेकडे हस्तांतरित झालेले आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टीपीएस-१८१८/१३४९/प्र.क्र.२२९/१८/२०(४)/नवि-१३, दिनांक २० नोव्हेंबर २०१८ द्वारे प्रादेशिक योजना क्षेत्रात आणि अधिसूचना क्र. टीपीएस-१८१६/प्र.क्र.३६८(भाग-१)/१५/३७ *(१कक)(ग)*/वियो/नवि-१३, दिनांक ८ मार्च २०१९ द्वारे विशेष नियोजन प्राधिकरणाच्या क्षेत्रामधील एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाच्या विकासासाठी विकास नियंत्रण नियमावली अंतर्भूत केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचित विशेष नगर वसाहत प्रकल्पाचे क्षेत्र पुणे महानगर प्रदेशांतर्गत येत असल्याने, उक्त प्राधिकरणाने दिनांक २१ डिसेंबर २०१९ रोजी उक्त नियमावलीमधील विनियम क्र. ६.६.१ नुसार उक्त अधिसूचित नगर वसाहत प्रकल्पाच्या ४०.४४९७ हे. क्षेत्राचे द्वितीय सुधारित बृहत् आराखड्यास काही अटी व शर्तीसापेक्ष मंजुरी दिली असून, त्यानंतर दिनांक १४ मे २०२५ रोजी सुमारे ७९.८१७६ हे. क्षेत्राच्या अकराव्या सुधारित बृहत् आराखड्यास (यात यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त एकात्मिक नगर वसाहत प्रकल्प" असा केला आहे) ;

आणि ज्याअर्थी, शासनाने मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मधील एकात्मिक नगर वसाहत प्रकल्पाच्या (ITP) धोरणामध्ये बदल करण्यासाठी विनियम क्र. १४.१ मध्ये केलेला फेरबदल, उक्त अधिनियमाचे कलम ३७ *(१कक) (ग)* व २० *(४)* चे तरतुदीन्वये अधिसूचना क्र. १८२१/४५२/प्र.क्र.१०५/२०२२/(भाग-२)/नवि-१३, दिनांक ५ सप्टेंबर २०२४ नुसार मंजूर केलेला असून, या विनियम क्र. १४.१ मधील तळटीपनुसार, मंजूर फेरबदलाच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी NAINA, CIDCO, MSRDC आणि PMRDA या नियोजन प्राधिकरणांच्या प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीमधील एकात्मिक नगर वसाहत प्रकल्पाच्या (ITP) विनियमामध्ये उक्त फेरबदलानुसारच्या तरतुदी लागू राहतील व NAINA, CIDCO, MSRDC आणि PMRDA यांच्या विकास नियंत्रण नियमावलीमधील कोणताही बदल प्रस्तावित नसलेल्या प्रचलित ITP क्षेत्राशी संबंधित तरतुदी आहेत तशा लागू राहणार आहेत (यात यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त नियमावली" असा केला आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रकल्प प्रवर्तक यांनी मौजे वाघोली व मांजरी खुर्द, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील सुमारे ४१.३५१४ हे. या क्षेत्राच्या जमिनींवर प्रस्तावित केलेल्या विशेष नगर वसाहत प्रकल्पात, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी मौजे वाघोली येथील २०.१४५० हे. वाढीव क्षेत्र अधिसूचना क्र. प्रा.यो.पुणे/मौ. मांजरी खुर्द,वाघोली/ए.न.व.प्र./टीपीव्ही-१/२९८६, दिनांक २७ ऑक्टोबर २०२० अन्वये आणि शासनाच्या नगर विकास विभागाने अधिसूचना क्र. टीपीएस-१८२१/१६६१/प्र.क्र.१३८/२०२२/नवि-१३, दिनांक २० फेब्रुवारी २०२३ अन्वये ५.८६४ हे. वाढीव क्षेत्र अधिसूचित करून स्थानीय मंजुरी दिली आहे. त्यानंतर संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य यांनी अधिसूचना क्र. प्रा.यो. पुणे/मौ. मांजरी खुर्द व वाघोली/ए.न.व.प्र./टीपीव्ही-१/३८८५, दिनांक १९ जुलै २०२४ अन्वये २.४२२१ हे. वाढीव क्षेत्र, तसेच ६.०३५१ हे. वाढीव क्षेत्र अधिसूचना क्र. प्रा.यो.पुणे/मौ.मांजरी खुर्द/ए.न.व.प्र./टीपीव्ही-१/६१९४, दिनांक २२ नोव्हेंबर २०२४ अन्वये आणि ४.० हे. वाढीव क्षेत्र अधिसूचना क्र. प्रा.यो.पुणे/मौ.वाघोली/ए.न.व.प्र./ॲशडॅन/टीपीव्ही-१/१४६४, दिनांक २५ मार्च २०२५ अधिसूचित करून स्थानीय मंजुरी दिली आहे. त्यानुसार स्थानिय मंजुरी दिलेले एकूण क्षेत्र ७९.८१७६ हेक्टर इतके आहे (यात यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिसूचित एकात्मिक नगर वसाहत प्रकल्प" असा करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, आता उक्त प्रकल्प प्रवर्तक यांनी उक्त नियमावलीतील विनियम क्र. १४.१.१.४ v) मधील तरतुदीनुसार मौजे वाघोली, येथील गट नं. १२७६/३८, क्षेत्र ४.० हे., व मौजे मांजरी खुर्द येथील १६९ पैकी १.१९२५ हे. असे एकूण ५.१९२५ हेक्टर क्षेत्र उक्त प्रकल्पाच्या क्षेत्रात नव्याने समाविष्ट करून, उक्त प्रकल्प राबविण्यासाठी सुधारित स्थानीय मंजुरी मिळणेबाबतचा प्रस्ताव दिनांक १५ मे २०२५, दिनांक २ जून २०२५ व दिनांक ५ जून २०२५ रोजीच्या पत्रान्वये संचालनालयाकडे सादर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रादेशिक योजनेच्या प्रस्तावानुसार सदरच्या वाढीव प्रकल्प क्षेत्रातील जमिनी या "शेती तथा ना-विकास" विभागामध्ये समाविष्ट असून, २४.० मी. व ३०.० मी. प्रादेशिक योजना रस्त्याने बाधित होत आहेत ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रकल्प प्रवर्तक यांनी सादर केलेल्या कागदपत्रांनुसार उक्त प्रकल्पात अंतर्भूत करणेचे प्रस्तावित असलेल्या उक्त वाढीव जमिनींची मालकी आणि विकसन अधिकार प्रकल्प प्रवर्तक यांनी संपादित केले आहेत आणि त्या संबंधानेच्या महसूल अभिलेखाप्रमाणे प्रकल्प प्रवर्तक यांनी त्या परिणामी प्रतिज्ञापत्र सादर केले आहेत ;

आणि ज्याअर्थी, उक्त नियमावलीतील विनियम क्र. १४.१.१.४ v) नुसार एकात्मिकृत नगर वसाहतीसाठी स्थानीय मंजुरी दिलेल्या क्षेत्राच्या ५० टक्केपर्यंत क्षेत्र प्रकल्पामध्ये अंतर्भूत करण्यास किंवा वगळण्यास, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य पुणे हे मान्यता देऊ शकतात, अशी तरतूद आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रकल्प प्रवर्तक यांनी विनंती केल्यानुसार उक्त प्रकल्पामध्ये समाविष्ट करावयाचे क्षेत्र हे शासनाने स्थानीय मंजुरी दिलेल्या एकूण ७९.८१७६ हे. क्षेत्राच्या ५० टक्के मर्यादेत आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रकल्पामध्ये समाविष्ट करावयाच्या जमिनींचे क्षेत्र उक्त अधिनियमाच्या कलम १८ चे पोट-कलम ३ नुसार उक्त प्रादेशिक योजना नकाशावर निर्देशित करणे आवश्यक आहे ;

आणि ज्याअर्थी, रहिवास व वाणिज्य वापराव्यतिरिक्तच्या अन्य वापर विभागात अंतर्भूत उक्त वाढीव जमिनींकरिता उक्त प्रकल्प अनुज्ञेय करण्यासाठी उक्त नियमावलीतील विनियम क्र. ७.१.२ नुसार भराव्या लागणाऱ्या अधिमूल्यापैकी स्थानीय मंजुरीच्या टप्प्यावरील १० टक्केप्रमाणे रकमेचा भरणा रुपये २०,२८,६६०, चलन क्र. GRN MH००४२०५६५७२०२५२६P, दिनांक २३ जून २०२५/डिफेस्ड क्र. ०००२५६०४७६२०२५२६, दिनांक २६ जून २०२५ अन्वये प्रकल्प प्रवर्तकांनी सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे यांच्यामार्फत शासकीय कोषागारात केला आहे.

त्याअर्थी, आता संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे याद्वारे, सोबत जोडलेल्या 'अनुसूची-अ'मध्ये सविस्तरपणे नमूद केलेले, ५.१९२५ हे. इतके क्षेत्र, यापूर्वी उक्त स्थानीय मंजुरी प्राप्त असलेल्या उक्त प्रकल्प क्षेत्रात अंतर्भूत करण्यास उक्त नियमावलीमधील विनियम क्र. १४.१.१.४ v) चे अंतर्गत खालील अटीं व शर्तींस अधीन राहून मान्यता देत आहेत ;

एकात्मिकृत नगर वसाहतीसाठी अटी व शर्ती :--

(१) मालकी हक्कासंबंधित :--

(१) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाखालील क्षेत्रांसह उक्त वाढीव जमिनींच्या मालकीसंबंधीच्या सत्यतेची सर्व जबाबदारी उक्त प्रकल्प प्रवर्तक यांचेवर राहील, तसेच उक्त जमिनींचे सर्व मालकी/विकसन हक्क उक्त प्रकल्प प्रवर्तकांकडे असणे आवश्यक राहील. जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे इरादापत्राकरिता अर्ज करताना नोंदणीकृत सामंजस्य कराराची प्रत, संयुक्त उपक्रमाची नोंदणीकृत कागदपत्रे, मूळ मोजणी नकाशे, मालकी हक्क, विकास हक्क सिद्ध करणारी कागदपत्रे इत्यादी कागदपत्रांच्या मूळ प्रमाणित प्रती सादर करणे उक्त प्रकल्प प्रवर्तकांवर बंधनकारक राहील.

(२) उपअधीक्षक, भूमी अभिलेख यांच्याकडून देण्यात आलेले अधिकृत मोजणी नकाशे उपलब्ध झाल्यानंतर प्रस्तावांतर्गत समाविष्ट करावयाच्या जमिनी उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पात अंतर्भूत करणे आवश्यक आहेत. जर उक्त वाढीव जमिनी उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पांतर्गतच्या अशा जमिनींशी सलग राहत नसतील तर, अशा जमिनींचे क्षेत्र उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्रातून आपोआप वगळल्या जातील व अशा क्षेत्रात उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प राबविता येणार नाही.

(३) इरादापत्र देण्यापूर्वी उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पामध्ये अंतर्भूत जमिनींपैकी भू-धारणापद्धती भोगवटा वर्ग-२, सरकार व नवीन शर्तीच्या जमिनीसंदर्भाने, व इतर हक्कात नागरी जमीन कमाल धारणा अधिनियमान्वयेचे घोषित अतिरिक्त क्षेत्र, नागरी जमीन कमाल धारणा अधिनियमाचे कलम २० योजनेचे क्षेत्र इत्यादीबाबत आवश्यक ती कार्यवाही जिल्हाधिकारी, पुणे यांनी करणेची आहे.

(४) इरादापत्र देण्यापूर्वी उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पांतर्भूत जमिनींच्या ७/१२ उताऱ्यांवरील इतर हक्क स्तंभात नमूद बँकेचे भार व नावे असल्यास त्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांनी पडताळणी करावी व नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी.

(५) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्रात समाविष्ट करावयाच्या उक्त वाढीव जमिनींच्या ७/१२ उताऱ्यानुसार सर्व्हे नंबर व हिस्सा नंबर मोजणी नकाशानुसार जुळत असल्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांनी इरादापत्र (Letter of Intent) देणेपूर्वी खात्री/पडताळणी करणे आवश्यक राहील.

(६) उक्त प्रकल्प क्षेत्रात समाविष्ट जागेच्या मालकी हक्कासंदर्भात कोणतेही दस्तऐवज खोटे असल्याचे भविष्यात उघडकीस आल्यास किंवा उक्त प्रकल्पाबाबत भविष्यात न्यायालयीन वाद उद्‌भवल्यास त्याबाबत स्वत:च्या जबाबदारी व खर्चाने उपाययोजना करण्याची सर्वस्वी जबाबदारी उक्त प्रकल्प प्रवर्तकाची राहील. अशा परिस्थितीत अशा जमिनींसाठी देण्यात आलेली स्थानीय मंजुरी रद्द समजण्यात येईल.

(७) विषयांकित सुधारित स्थानीय मंजुरी मिळणेबाबतचा प्रस्ताव, मे. ॲशडॅन डेव्हलपर्स प्रा. लि., अतुल अशोक चोरडीया, अशोक धनराज चोरडीया व इतर विविध १० कंपन्या अशा एकूण १३ व्यक्ती/कंपन्यांच्यावतीने व आता नव्याने समाविष्ट करावयाचे उक्त क्षेत्र मे. पलस्पिक रिॲलिटी एलएलपी व पेसर रिअल डेव्हलपर्स एलएलपी या कंपन्यांच्यावतीने अधिकृत स्वाक्षरीकर्ता श्री. सुमित दिवाणे यांनी स्थानीय मंजुरी मिळणेसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे.

शासनाने / संचालनालयाने यापूर्वी दिलेल्या स्थानीय मंजुरीनुसार एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाच्या अधिसूचित क्षेत्रावर विनियमांमधील तरतुदींनुसार एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प उभारण्याची सर्वस्वी जबाबदारी मुख्य प्रकल्प प्रवर्तक मे. ॲशडॅन डेव्हलपर्स प्रा. लि., यांचेसह उक्त सर्व व्यक्ती / कंपन्यांवर असल्याने, या सर्व कंपन्यांचे मालक / संचालक / भागीदार यांची नावे आणि त्यासर्वांचे परस्परांशी असलेले संबंध याबाबतची कागदपत्रे प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे. सबब, अशी कागदपत्रे प्रकल्प प्रवर्तकांनी प्रकल्पास इरादापत्र (Letter of Intent) घेणेपूर्वी जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करणे बंधनकारक राहील.

(II) पर्यावरण व इतर अनुषंगिक बाबी :-

(१) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्रात समाविष्ट करावयाच्या जमिनींमध्ये कोणतेही विकास / बांधकाम हाती घेणेपूर्वी केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालय आणि योग्य त्या प्राधिकरणाची पर्यावरणीय मंजुरी (Environmental Clearance) घेणे आवश्यक राहील, तसेच केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालयाकडील पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन अधिनियम, १९८६ अंतर्गत वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचनेमधील अटी व शर्तींचे पालन करणे प्रवर्तकावर बंधनकारक राहील.

(२) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पामधील घनकचऱ्याची आणि सांडपाण्याची विल्हेवाट सुरक्षितपणे लावण्यासाठी योग्य ती व्यवस्था उक्त प्रकल्प प्रवर्तकांनी त्यांच्या जबाबदारीवर व स्वखर्चाने आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ठरविलेल्या निकषाप्रमाणे व तसेच त्यासंबंधीच्या अधिनियमातील तरतुदी व नियमानुसार करणे आवश्यक राहील, तसेच जलसंधारण व जलपुनर्भरण याकरिता संबंधित विभागाचे सहमतीने उपाययोजना करणे प्रवर्तकावर बंधनकारक राहील.

(३) प्रकल्पात समाविष्ट करावयाच्या मौजे वाघोली, गट नंबर १२७६/३८ व मौजे मांजरी खुर्द १६९ पैकी या जमिनी लाभ क्षेत्रात येत असल्याचे नमूद करून, विकासकामे करण्यापूर्वी शासनाच्या सक्षम स्तरावरून पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक असल्याचे जलसंपदा विभागाने, प्रकल्प प्रर्वतक यांना पत्र क्र. ३३१२, दिनांक २९ मे २०२२ अन्वये कळविलेले आहे. त्यामुळे विषयांकित जमिनींवर विकासकामे करण्यापूर्वी शासनाच्या सक्षम स्तरावरून पूर्वपरवानगी घेणे प्रकल्प प्रर्वतक यांचेवर बंधनकारक राहील.

राज्य शासनाचे जलसंपदा विभाग व अन्य संबंधित विभाग वेळोवळी विहित करतील, त्या अटी व शर्तींचे पालन करणे उक्त प्रकल्प प्रवर्तकावर बंधनकारक राहील. उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्रातून विद्यमान पाण्याचे स्रोत / नाल्याचा प्रवाह असल्यास तो बंद करता येणार नाही.

प्रकल्पात समाविष्ट करावयाच्या जमिनींबाबत आवश्यकतेनुसार पुनर्स्थापना खर्चाबाबत जलसंपदा विभागाचे प्रमाणपत्र / ना-हरकत प्रमाणपत्र, प्रकल्पास इरादापत्र (Letter of Intent) मिळणेपूर्वी जिल्हाधिकारी यांनी घेणे आवश्यक राहील.

(४) सहायक संचालक, पुरातत्व विभाग, पुणे यांनी दिलेल्या ना-हरकत प्रमाणपत्रातील अटी व शर्ती प्रकल्प प्रवर्तकांवर बंधनकारक राहातील.

(५) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाच्या विकासाकामी उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प विकासाकरिताच्या नियमावलीमधील विनियम क्र. १४.१.१.१० v) a) नुसार पाणीपुरवठा उक्त प्रकल्प प्रर्वतकाने त्यांच्या स्वखर्चाने व जबाबदारीने करणे आवश्यक राहील. जलसंपदा विभागाकडून यानुषंगाने वेळोवेळी दिलेल्या अटींचे पालन करणे उक्त प्रकल्प प्रवर्तकावर बंधनकारक राहील.

(६) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाच्या विकासाकामी उक्त एकात्मिकृत नगर वसाहतीकरिताच्या नियमावलीतील विनियम क्र. १४.१.१.१० v) c) नुसार वीजपुरवठा उक्त प्रकल्प प्रवर्तकाने त्यांच्या स्वखर्चाने व जबाबदारीवर करणे आवश्यक राहील, तसेच उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प विकासाकरिताच्या नियमावलीतील विनियम क्र. १४.१.१.६ v) नुसार उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाचा बृहत आराखडा मंजूर करणेपूर्वी संबंधित प्राधिकरणाने उक्त प्रकल्प प्रवर्तकाकडून वीजपुरवठा करणाऱ्या कंपनीकडून उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाच्या संपूर्ण क्षेत्राकरिता आवश्यक परवानगी आणि तसेच वीज पुरवठ्याची दृढवचनबद्धता (Firm Commitment of Power Supply for the entire township from the power supply company) प्राप्त करणे आवश्यक राहील.

(७) प्रकल्प प्रवर्तकांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडील जमिनी या एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पामध्ये समाविष्ट नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

(III) विकासासंबंधाने :--

(१) उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्राने वेढल्या गेलेल्या अन्य खाजगी व्यक्तींच्या जमिनींसाठी नियमावलीनुसार आवश्यक परंतु किमान ९.० मी. रुंदीचा पोचमार्ग विनामोबदला उपलब्ध करून देणे उक्त प्रकल्प प्रवर्तकावर बंधनकारक राहील.

(२) उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्राच्या जमिनींमधून जाणाऱ्या विद्यमान सार्वजनिक रस्त्यांच्या वहिवाटीचे हक्क अबाधित ठेवणे उक्त प्रकल्प प्रवर्तकावर बंधनकारक राहील.

(३) उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्रांमधील ओहोळ / नाल्यावर संबंधित विभागाच्या परवानगीने सी.डी.वर्क करणे आणि उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्रामध्ये अंतर्भूत नदी, नाले, कॅनॉल, तलाव आणि इतर जलस्रोतापासून उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प विकासाकरिताच्या नियमावलीनुसार आवश्यक ते अंतर ठेवणे उक्त प्रकल्प प्रवर्तकावर बंधनकारक राहील.

(४) प्रादेशिक योजना नकाशावर विशेषत: दर्शविले असले अथवा नसले तरीही अधिकृत कंटूर नकाशानुसार १:५ किंवा त्यापेक्षा जास्त तीव्र उताराचे क्षेत्रावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम अनुज्ञेय नाही, तसेच या क्षेत्रामध्ये जमिनींची खोदाई / सपाटीकरण / भराव इत्यादी विकास कार्य अनुज्ञेय होणार नाही.

(५) उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पामध्ये सामाविष्ट होणाऱ्या लोकसंख्येसाठी नियमानुसार आवश्यक असणारी सार्वजनिक प्रयोजनासाठीची आरक्षणे आणि तसेच मूलभूत सुविधा यासाठी उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाच्या क्षेत्रामध्ये सुयोग्यस्थानी नियोजन आणि निश्चित करून ती उक्त प्रकल्प प्रवर्तकांनी त्यांच्या स्वखर्चाने विकसित करणे बंधनकारक राहील.

(६) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पामध्ये प्रत्येक इमारतीकरिता Rain Water Harvesting यंत्रणा उभारणी व कार्यान्वित करणे उक्त प्रकल्प प्रवर्तक यांचेवर बंधनकारक राहील.

(७) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पामधील प्रत्येक इमारतीमधील वापरण्यात येणाऱ्या पाण्यासंदर्भात Waste Water Recycling ची प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर होईल, याबाबतची सुविधा यंत्रणा उपलब्ध करून देण्याचे उक्त प्रकल्प प्रवर्तक यांचेवर बंधनकारक राहील.

(८) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पामध्ये सौर उर्जा वापर यंत्रणा उभारणी आणि कार्यान्वयन करणे उक्त प्रकल्प प्रवर्तक यांचेवर बंधनकारक राहील.

(IV) इतर अटी व शर्ती :--

(१) या अधिसूचनेत नमूद अटी / शर्तींसह शासनाने उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाच्या मूळ स्थानीय मंजुरीच्यावेळी दिनांक ४ एप्रिल २००८, दिनांक ४ डिसेंबर २००८ व दिनांक २० फेब्रुवारी २०२३, तसेच संचालनालयाकडील दिनांक २७ ऑक्टोबर २०२०, दिनांक १९ जून २०२४, दिनांक २२ नोव्हेंबर २०२४ व दिनांक २५ मार्च २०२५ रोजीच्या अधिसूचनेत नमूद केलेल्या सर्व अटी / शर्ती उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्रासाठी लागू राहतील.

(२) उक्त प्रकल्प प्रवर्तकांकडून अटीं व शर्तींचा भंग झाल्यास या अधिसूचनेद्वारे प्रदान करण्यात आलेली स्थानीय मंजुरी रद्द करण्याचा अधिकार शासनाकडे राखून ठेवण्यात येत आहे. अशा स्थितीत स्थानीय मंजुरी रद्द झाल्यास शासनाकडे जमा केलेले अधिमूल्य किंवा इतर रक्कम परत मिळणार नाही.

(३) शासनाने दिनांक ५ सप्टेंबर २०२४ रोजीच्या अधिसूचनेद्वारे मंजूर केल्यानुसार, एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील विनियम क्र. १४.१ मधील तरतुदी त्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या बदलांसह लागू राहतील.

(४) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्राकरिता उक्त नियमावलीमधील विनियम क्र. १४.१.१.७ v) Share of Local/ Planning Authority नुसारच्या तरतुदी लागू राहतील.

(५) सदर अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अमलात येईल.

(६) प्रस्तावाखालील स्थानीय मंजुरी प्राप्त उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पात समाविष्ट करावयाच्या उक्त वाढीव जमिनींचा तपशील सोबतच्या 'अनुसूची-अ'मध्ये दर्शविण्यात आला आहे, तसेच वाढीव जमिनींसह उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाची हद्द दर्शविणारा नकाशा 'अनुसूची-ब' अधिसूचनेसोबत जोडला आहे.

(७) पुणे महानगर विकास प्राधिकरणाच्या प्रारूप / अंतिम विकास योजनेमधील विकास योजना रस्ते, आरक्षणे व प्रस्ताव सदर एकात्मिकृत नगर वसाहतीमध्ये कायम ठेवून त्यांचा विकास करून, त्या सुविधा सर्वसामान्य जनतेसाठी उपलब्ध करून देणे प्रकल्प प्रवर्तकांवर बंधनकारक राहील.

उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पात अंतर्भूत करावयाच्या उक्त वाढीव जमिनींचा तपशील आणि हद्दी दर्शविणारा नकाशा सदर अधिसूचनेसह नागरिकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन वेळेमध्ये कामकाजाच्या दिवशी खाली नमूद कार्यालयामध्ये एक महिन्याच्या कालावधीकरिता उपलब्ध राहील.

१. महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.

२. जिल्हाधिकारी, पुणे.

३. सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे.

४. उपसंचालक, नगर रचना, नागरी संशोधन घटक, मुख्य कार्यालय, पुणे.

५. सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा.

अनुसूची - अ

मे. ॲशडॅन डेव्हलपर्स प्रा. लि., मांजरी हाउसिंग प्रोजेक्ट एलएलपी, वाघोली प्रॉपर्टीज, क्रोनिक्स, प्रोजेक्ट्स प्रा. लि., एन्व्हिजन कन्स्टुवेल एलएलपी, असोज रिॲल्टी एलएलपी, वेस्टकॉन स्पेसेस प्रा. लि., पल्सपिक रिॲल्टी एलएलपी व पेसर रिअल डेव्हलपर्स एलएलपी यांच्या मौजे वाघोली-मांजरी खुर्द, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील मंजूर एकात्मिक नगर वसाहत प्रकल्पामध्ये समाविष्ट करावयाच्या क्षेत्राचा तपशील

अ.क्र.	मौजे	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	प्रकल्पात नव्याने समाविष्ट करून अधिसूचित करावयाचे क्षेत्र (हे.)
१	२	३	४	५
	अधिसूचित केलेल्या क्षेत्रामध्ये वाढ झालेल्या क्षेत्राचा तपशील :--			
१	वाघोली	१२७६	३८	४.०
२	मांजरी खुर्द	१६९	पैकी	१.१९२५
			एकूण	**५.१९२५ हे.**
दिनांक २५ मार्च २०२५ रोजीच्या अधिसूचनेद्वारे अधिसूचित केलेले क्षेत्र.				७९.८१७६ हे.
या अधिसूचनेद्वारे एकात्मिक नगर वसाहतीचे एकूण सुधारित अधिसूचित केलेले क्षेत्र.				८५.०१०१ हे.

सदरहू अधिसूचना नगर रचना आणि मूल्यनिर्धारण संचालनालयाच्या www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी.

वि. ल. वाघमोडे,
प्र. संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे, १० जुलै २०२५.

I/C BY DIRECTOR OF TOWN PLANNING

Maharashtra Regional and Town Planning Act, 1966

NOTIFICATION

No. R.P.Pune/Wagholi-Manjari Kh./ITP/Ashdan/TPV-1/4124/2025.— Whereas, the Government in Urban Development Department, *vide* its Notification No. TPS-1895/227/C.R.26/95/UD-13, dated 25th November 1997 has sanctioned the Regional Plan for the Pune Region (hereinafter referred to as "the said Regional Plan") with Development Control Regulation under the provisions of Section 15 *(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") which has come into force with effect from dated 10th February 1998 ;

and whereas, the Government of Maharashtra in Urban Development Department, *vide* Notification No. TPS/1804/Pune RP D.C.R./UD-13, dated 16th November 2005 and Addendum No. TPS-1804/Pune RP D.C.R./UD-13/Addendum, dated 6th January 2006 has incorporated the regulations for Development of Special Townships by amending the sanctioned Development Control Regulations for the said Regional Plan, under the provisions of sub-section *(4)* of Section 20 of the said Act, and it has further amended from time to time ;

and whereas, in exercise of the powers conferred by the provisions of sub-section *(1)* of Section 3 of the Maharashtra Metropolitan Development Authority Act, 2016 the Government *vide* Notification of Urban Development Department No. PRD-3316/CR-54/UD-7, dated 11th July 2016 has established Metropolitan Region Development Authority to be called "the Pune Metropolitan Region Development Authority" (hereinafter referred to as "the said Development Authority") for the Metropolitan Area of Regional Plan more specifically described in the Schedule appended thereto ;

and whereas, the Government in Urban Development Department *vide* its Government Notification No. TPS-1817/CR-173/17/UD-13, dated 18th January 2018, appointed the said Development Authority as a "Special Planning Authority" under the provisions of Section 40 *(1)* of the said Act ;

and whereas, the Government in Urban Development Department has accorded Location Clearance for the Special Township Project proposed by L. K. Developers Pvt. Ltd., in Village Manjari Khurd and Wagholi, Taluka Haveli, District Pune on lands admeasuring an area of 40.0964 Ha., approximately *vide* Government Notification No. TPS-1807/245/C.R.641/07/UD-13, dated 4th April 2008 and thereafter Government in Urban Development Department has accorded Locational Clearance for additional lands admeasuring an area of 1.255 Ha. of village Manjari Khurd *vide* its Government Addendum No. TPS-1807/245/C.R.641/07/UD-13, dated 4th December 2008. Therefore, total area having Locational Clearance is 41.3514 Ha. (hereinafter referred to as the "said Notified Special Township Project") ;

and whereas, as per the Central Government's Certificate dated 9th April 2010, the name of L. K. Developers Pvt. Ltd., Company has been changed as Kul Developers Pvt. Ltd. and thereafter as per the Central Government's Certificate dated 21st May 2018, the name of Kul Developers Pvt. Ltd., has been changed as Ashdan Developers Pvt. Ltd., and accordingly the said Area has been transferred to Ashdan Developers Pvt. Ltd., (hereinafter referred to as "the said Project Proponent") ;

and whereas, the Government in Urban Development Department *vide* Notification No. TPS-1818/1349/CR-229/18/20(4)/UD-13, dated 20th November 2018 for Regional Plan Area and Notification No. TPS-1816/CR.368/16/part-1/DP-ITP/UD-13, dated 8th March 2019 sanctioned Development Control Regulations for the Special Planning Authority area in order to incorporate the regulations for Development of Integrated Townships Project ;

and whereas, the said Notified Special Township Project area came within Pune Metropolitan Region and the said Development Authority has sanctioned Second Revised Master Plan of the said Notified Township Project on dated 21st December 2019 for 40.4497 Ha. area with certain conditions as per Regulation No. 6.6.1 of the above said Regulations. Thereafter, Eleventh Revised Master Plan sanctioned on dated 14th May 2025 for 79.8176 Ha. area (hereinafter referred to as the "said Integrated Township Project") ;

and whereas, under the provisions of Section 37 *(1AA)(c)* and 20 *(4)* of the said Act, the Government in Urban Development Department *vide* its Notification No. TPS-1821/452/CR-105/2022/(Part-2)/UD-13, dated 5th September 2024 sanctioned the Modification, to make certain changes in the Regulation No. 14.1 for the Integrated Township Project of the sanctioned Unified Development Control and Promotion Regulations (UDCPR). As per the footnote of the above modified Regulation No. 14.1, for the effective implementation of these sanctioned Modifications will be applicable to the prevailing ITP policy of the respective DCR of NAINA, CIDCO, MSRDC and PMRDA, the prevailing provisions of ITP policy of respective DCR of NAINA, CIDCO, MSRDC and PMRDA will continue wherein no Modifications are proposed (hereinafter referred to as "the said Regulations") ;

and whereas, for the said Special Township Project proposed by the said Project Proponent in village Manjari Khurd and Wagholi, Taluka Haveli, District Pune on lands admeasuring as area of 41.3514 Ha., the Director of Town Planning, Maharashtra State, Pune has accorded Locational Clearance for additional land admeasuring 20.1450 Ha. *vide* Notification No. R.P.Pune/village-Manjari Khurd-Wagholi/ITP/TPV-1/2986, dated 27th October 2020 and additional land admeasuring 5.864 Ha. *vide* Government of Maharashtra in Urban Development Departments Notification No. TPS-1821/1661/CR-138/2022/UD-13, dated 20th February 2023. Thereafter, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune has accorded Locational Clearance for additional land admeasuring 2.4221 Ha. *vide* Notification No. R.P.Pune/village-Manjari Khurd, Wagholi/ITP/TPV-1/3885, dated 19th July 2024 and additional land admeasuring 6.0351 Ha. *vide* Notification No. R.P. Pune/village-Manjari Khurd, Wagholi/ITP/TPV-1/6194, dated 22nd November 2024 and an additional land admeasuring 4.0 Ha. *vide* Notification No. R.P.Pune/Wagholi/ITP/Ashdan/TPV-1/1464, dated 25th March 2025. Accordingly, total area having Locational Clearance is 79.8176 Ha. (hereinafter referred to as the "said Notified Integrated Township Project")

and whereas, the said Project Proponent now *vide* its letter dated 15th May 2025, 2nd June 2025 and 5th June 2025 submitted a proposal as per the provisions of Regulation No. 14.1.1.4 v) of the said Regulations to the Directorate for the grant of revised Locational Permission by incorporating new additional land admeasuring area about 4.0 Ha. from G. No. 1276/38 of village Wagholi and 1.1925 Ha. from S. No. 169 part of village Manjari khurd, Taluka Haveli, District Pune, totally 5.1925 Ha. in the area of the said Project ;

and whereas, as per the said Regional Plan, the said Additional Lands are included in "Agriculture and No Development Zone" and affected by the 24.00 mtrs. and 30.00 mtrs. wide R. P. Road ;

and whereas, as per the documents submitted by the said Project Proponent, the Ownership and Development Rights of the said Additional Lands proposed to be incorporated in the said Project are to be acquired by the said Project Proponent and the said Project Proponent has also submitted an Affidavits to that effect as per Revenue record ;

and whereas, as per the Regulation No. 14.1.1.4 v) of the said Regulation, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune as per the request of said Project Proponent, may grant to add or delete any area, not exceeding 50 per cent of the total area under Locational Clearance ;

and whereas, as per the request of the said Project Proponent, the area of the said Additional Lands to be added is less than 50 per cent of the 79.8176 Ha. area of the said Project, for which Government has given locational clearance.

and whereas, it is accordingly expedient to designate the area of the lands to be incorporated and deleted on the said Regional Plan under the provisions of sub-section *(3)* of Section 18 of the said Act as the additional project area for the said Project ;

and whereas, the said Project Proponent, *vide* Challan No. GRN MH004205657202526P, dated 23rd June 2025 / Defacement No. 0002560476202526, dated 26th June 2025 has deposited an amount of Rs. 20,28,660 through the Assistant Director of Town Planning, Pune Branch, Pune which is at the rate of 10 per cent of the total premium charges at the stage of Locational Permission as per the Regulation No. 14.1.1.7 i) b) of the said Regulation for said Project for the said Additional Lands falling in zones, other than Residential and Commercial ;

Now, therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune under the regulation No. 14.1.1.4 v) of the said Regulation hereby grants permission to add the area 5.1925 Ha. more specifically described in 'Schedule - A' appended hereto, in the area of said Notified Integrated Township Project for which Locational permission has already been granted, subject to the following terms and conditions ;

Terms & Conditions of Integrated Township Project :–

(I) Conditions of Ownership :–

(1) It shall be the responsibility of the said Project Proponent to procure the proof of Ownership / Development Rights of said Additional Lands along with the area under the said Notified Integrated Township Project. Also while applying for Letter of Intent, it is obligatory on the said Project Proponent to submit to the Collector, Pune, the extracts of original certified documents of the registered Memorandum of Understanding, registered documents of joint venture, original measurement plans, documents proving the ownership rights, development rights etc.

(2) Part area of lands shall be included in the said Notified Integrated Township Project after obtaining measurement plan issued by the Deputy Superintendent of Land Records. If such lands are not remain continuous with the lands under the said Notified Integrated Township Project, then area of land stand automatically deleted from the said Notified Integrated Township Project area and the said Notified Integrated Township Project shall not be implemented on such lands.

(3) The Collector, Pune should take appropriate action regarding land holding titles like "भोगवटा वर्ग-२", "सरकार" New Tenure "lands and Surplus lands declared under Urban Land Ceiling Act, area of schemes under Section 20 of the Urban Land Ceiling Act etc. which are included in the said Notified Integrated Township Project before issuing the letter of intent.

(4) The Collector, Pune shall verify and take appropriate action in respect of lands which are included in the said Notified Integrated Township Project having entries regarding bank encumbrances and names in the Other Right's column of 7/12 extract, before issuing the letter of intent.

(5) Before issuing Letter of Intent, the said Authority confirm / verify that, the Survey Number and Hissa Number of 7/12 extracts of the said Additional Lands to be included in the said Notified Integrated Township Project area should match with record of Measurement Plan.

(6) If any document of ownership of lands included in the area of the said Notified Integrated Township Project is found false in future or if any judicial proceedings arise regarding the said Notified Integrated Township Project in future, then it shall be the sole responsibility of the said Project Proponent to deal with those proceedings at his own risk and cost. In such case Locational Clearance shall be deemed to be cancelled automatically for those lands.

(7) The Proposal for obtaining the Revised Locational Clearance has been submitted by Shri. Sumit Diwane, authorized signatory on behalf of Ashdan Developers, Atul Ashok Chordia, Ashok Dhanraj Chordia and 10 others Various Companies, and new companies namely Pulsepeak Realty LLP and Pacer Real Estate Developers LLP.

As per the Locational Clearance given earlier by the Government / Directorate, the entire responsibility of implementing Integrated Township Project as per the provisions of the said Regulations lies with the said Project Proponent Ashdan Developers Pvt. Ltd., and all the above persons / companies. In this connection the names of the owners / directors / partners of all these companies and their mutual relationships are required to be submitted with the proposal. Therefore, such documents will be required to be submitted by the Project Proponent to the Collector before obtaining a Letter of Intent for the project.

(II) Conditions regarding Environment and Others :–

(1) The said Project Proponent shall obtain the Environmental Clearance from the Ministry of Environment, Forest and Climatic Change (MoEF and CC) and from the Appropriate Competent Authority before obtaining the Building Permission within the lands to be incorporated in the area of the said Notified Integrated Township Project. Also the terms and conditions of the Notifications issued by the Ministry of Environment, Forest and Climate Change for the Environment Impact Assessment Act, 1986 from time to time shall be binding on the said Project Proponent.

(2) The said Project Proponent shall be responsible for making provision for safe disposal of Solid Waste and effluents within the said Notified Integrated Township Project at his own risk and their own cost, as per the criteria and norms decided by the Maharashtra Pollution Control Board and also subject to the provisions and rules under the relevant Act in this regard.

(3) The Irrigation Department has informed the said Project Proponent *vide* Letter No. 3312, dated 29th May 2025 that lands bearing Gat No. 1276/38 of village Wagholi and S. No. 169 part of village Manjari khurd, falls within the command area and it is mandatory to obtain prior permission from the competent level of the Government, before carrying out development works. Therefore, it is mandatory for the said Project Proponent to obtain prior permission from the competent level of the Government, before carrying out development works.

The terms and conditions imposed by the Irrigation Department and other concerned department of the State Government from time to time shall be binding on the said Project Proponent. The existing nallas / water courses, etc., in the area of the said Notified Integrated Township Project shall not be closed.

In respect of lands to be included in the said Project, a Certificate / No-objection Certificate of Irrigation Department about cast of restoration as required should be obtained by the Collector before getting the Letter of Intent for the Project.

(4) The terms and conditions mentioned in the No-objection Certificate issued by the Assistant Director, Department of Archaeology shall be binding on the the said Project Proponent.

(5) It shall be binding on the said Project Proponent to provide water supply for the development of the said Notified Integrated Township Project as per the provisions of Regulation No. 14.1.1.10 v) a) of the said Regulations at their own cost and responsibility. The conditions prescribed by Irrigation Department in these regards, from time to time are binding on the said Project Proponent.

(6) It shall be binding on the said Project Proponent to provide electricity supply for the development of the said Notified Integrated Township Project as per the provisions of Regulation No. 14.1.1.10 v) c) of the said Regulation at their own cost and responsibility. Also the said Authority, shall obtain from the Project Proponent, necessary permissions and also the firm commitment of electricity supply for the entire area of the said Notified Integrated Township Project from the concerned power supply company before the approval of the Master Plan as per the provisions of Regulation No. 14.1.1.6 v) of the said Regulation.

(7) The said Project Proponent shall submit certificate regarding the lands of Maharashtra Industrial Development Corporation are not included in Integrated Township.

(III) Regarding Development :–

(1) The said Project Proponent shall provide access road of required width as per said Regulation but minimum 9.00 mtrs. free of cost to the lands owned by other private persons, which are surrounded by the area under the said Notified Integrated Township Project.

(2) It is binding on the said Project Proponent to protect the easement rights of the existing public roads passing through the area of the said Notified Integrated Township Project.

(3) It shall be binding on said Project Proponent to construct CD work on Nalla included in the area of the said Notified Integrated Township Project with the permission of concern department and to keep distance from River, Nallas, Canal, Lake and other Water Bodies within the area of the said Notified Integrated Township Project required as per the said Regulation for Development of Integrated Township Project.

(4) No construction of any type shall be allowed on the lands having slope equal to or more than 1:5 in the said project, whether such lands are specifically marked as such on the Development Plan or not. Also No development activity shall be permissible and no development involving cutting / levelling / filling etc. Shall be allowed on such lands.

(5) The said Project Proponent shall have to plan and earmark the lands at suitable location within the area of the said Notified Integrated Township Project for public purpose reservations and also for basic infrastructure required for the population to be accommodated within the said Project, as per the said Regulation and shall plan and develop the same at his own cost.

(6) It shall be binding on the said Project Proponent to provide the System of Rain Water Harvesting in each building of the said Notified Integrated Township Project.

(7) It shall be binding on the said Project Proponent to provide the System of Waste-Water Recycling in each building of the said Notified Integrated Township Project for reuse of the used water.

(8) It shall be binding on the said Project Proponent to provide and operate Solar Energy System within the said Notified Integrated Township Project.

(IV) Other Terms and Conditions :–

(1) The terms and conditions mentioned with reference to the Locational Clearance, amalgamation and the said Additional area *vide* Notifications dated 4th April 2008, dated 4th December 2008 and dated 20th February 2023 issued by the Government in Urban Development Department and Notification dated 27th October 2020, 19th July 2024, 22nd November 2024 and dated 25th March 2025 issued by Directorate of Town Planning shall be applicable for the said Notified Integrated Township Project.

(2) In case of breach of any of the terms and conditions by the said Project Proponent the powers / rights of cancellation of the Locational Clearance granted *vide* this Notification are reserved with Government. If Locational Clearance stands cancelled due to non-compliance or non-fulfilment of above stated conditions then, the premium or any other amount paid by the Applicant to the Government shall not be refunded.

(3) As per the Modifications sanctioned by the Government *vide* Notification dated 5th September 2024, the provisions of Regulation No. 14.1 of Integrated Township Project of Unified Development Control and Promotional Regulations shall be applicable as amended from time to time.

(4) The provisions mentioned in Regulation No. 14.1.1.7 v) of the said Regulation regarding the share of Local / Planning Authority shall be applicable for the said Notified Integrated Township Project.

(5) This Notification shall come into force on the date of its publication in the Maharashtra Government Gazette.

(6) The details of the said Additional Lands incorporated within the said Notified Integrated Township Project are given in 'Schedule-A' appended hereto. Also the plan showing the boundaries of the said Notified Integrated Township Project including the said additional lands is given in 'Schedule-B' appended hereto.

(7) It is binding on the said Project Proponent to provide and develop the Development Plan Roads, reservations and proposals provided in the Draft / Final Development Plan of PMRDA and these shall be made available to the common public.

The details of the said Additional Lands incorporated within the said Notified Integrated Township Project and the Plan showing the boundaries along with this Notification shall be made available for the inspection of the general public during office hours on all working days at the following offices :–

1. The Metropolitan Commissioner, Pune Metropolitan Region Development Authority, Pune.

2. The Collector, Pune.

3. The Joint Director of Town Planning, Pune Division, Pune.

4. The Deputy Director of Town Planning, Urban Research Cell, Pune.

5. The Assistant Director of Town Planning, Pune Branch.

Schedule - A

Details of Lands included in Integrated Township Project of Ashdan Developers Pvt. Ltd., Manjari Housing Projects LLP., Wagholi Properties, Chronix Projects Pvt. Ltd., Envision Constuvel LLP., Asoj Realty LLP, Westcon Spaces Pvt. Ltd., Pulsepeak Realty LLP and Pacer Real Estate Developers LLP. Wagholi-Manjari kh., Taluka Haveli, District Pune

Sr. No.	Mouje	Survey No.	Hissa No.	Details of land area to be included in earlier notified area (Ha.)
1	2	3	4	5
1	Wagholi	1276	38	4.0
2	Manjari Kh.	169	Part	1.925
			Total	**5.1925 Ha.**
Area Notified By Notification dated 25th March 2025.				79.8176 Ha.
Total Revised Notified Area of Township.				85.0101 Ha.

This Notification shall also be published on the website of Directorate of Town Planning and Valuation **www.dtp.maharashtra.gov.in**

V. L. WAGHAMODE,

I/c. Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

Pune, 10th July 2025.

जिल्हाधिकारी यांजकडून

जिल्हा पुणे

अधिसूचना

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२६ पोट-कलम (४) सह भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम १९ ची घोषणा.

अधिसूचना

क्रमांक पीएलए/कावि/९८६/२०२५.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. पीसीसी-३०९६/१८०१/सीआर-२६१/यूडी-२२, दिनांक ११ सप्टेंबर १९९७ अन्वये पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची हद्दवाढ मंजूर करण्यात आली आहे. त्यामध्ये मौजे दिघी, तालुका हवेली, जिल्हा पुणे या गावाच्या उर्वरित भागाचा समावेश आहे. सदरचा भाग पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये दिनांक २९ जानेवारी १९९८ पासून समाविष्ट झाला आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र शासनाने, अधिसूचना क्र. टीपीएस-१८०८/८९४/सी.आर-१७२७/०९/नवि-१३, दिनांक १८ ऑगस्ट २००९ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३१ पोट-कलम *(१)* अन्वये मंजूर केली असून ती दिनांक १ ऑक्टोबर २००९ पासून अमलात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, सोबतच्या अनुसूची-एकमध्ये नमूद केलेल्या जमिनी (यात यापुढे "उक्त जमिनी" म्हणून संबोधिलेल्या) उक्त सोबतच्या अनुसूची-दोनमध्ये नमूद केलेल्या उक्त मंजूर विकास योजनेतील मौजे दिघी, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील जमीन, सर्व्हे नंबर २० चा (भाग), या मिळकतीमधील क्षेत्र आरक्षण क्रमांक २/१३८, "सांस्कृतिक केंद्र व वाचनालय" या सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षित आहेत (यात यापुढे "उक्त सार्वजनिक प्रयोजन" म्हणून संबोधिलेल्या) ;

आणि ज्याअर्थी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने (यात यापुढे "उक्त महानगरपालिका" म्हणून संबोधिलेली) उक्त महाराष्ट्र अधिनियम, १९६६ च्या कलम १२६, पोट-कलम *(१)* अन्वये उक्त जमिनी उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादन करण्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पत्र क्रमांक नरवि/कावि/१२/७४/२०१८, दिनांक १६ मे २०१८ अन्वये अर्ज केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभागाने, उक्त महाराष्ट्र अधिनियम, १९६६ च्या कलम १५१, पोट-कलम *(१)* खाली काढलेली अधिसूचना क्रमांक टीपीएस-२१७५/५१०६/नवि-७, दिनांक ३ मार्च १९७९ अन्वये, उक्त मंजूर विकास योजनेतील सार्वजनिक प्रयोजनासाठी विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या जमिनींच्या संपादनाबाबतच्या उक्त महाराष्ट्र अधिनियम, १९६६ च्या कलम १२६, पोट-कलम *(१), (२)* व *(४)* खालील राज्य शासनाने वापरावयाच्या शक्ती त्या-त्या जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेल्या आहेत ;

आणि ज्याअर्थी, उक्त भूसंपादन प्रकरणी उपअधीक्षक, भूमी अभिलेख, तालुका हवेली, जिल्हा पुणे व भूसंपादन संस्था या नात्याने पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे प्रतिनिधी यांनी संयुक्तपणे मोजणी केली असून सादर केलेल्या संयुक्त मोजणी नकाशा व क्षेत्रविवरण तक्त्यांच्या अनुषंगाने पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने पत्र क्रमांक. नरवि/कावि/१२/५३/२०२० Trac No.नगर रचना/१६, दिनांक ९ जून २०२० अन्वये संयुक्त मोजणी नकाशात दर्शविलेल्या आरक्षणाची आखणी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील नकाशाशी सुसंगत आहे असा अभिप्राय दिलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, संपादनांखालील क्षेत्र मंजूर विकास योजनेतील आरक्षणाच्या आखणीनुसार संपादित होत असल्याबाबत खातरजमा करण्याची जबाबदारी, तसेच आरक्षणाच्या आखणी व संपादनांतर्गत जागेच्या हद्दीबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी भूसंपादन संस्था या नात्याने पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाचा, सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२ अन्वये उक्त महाराष्ट्र अधिनियम, १९६६ अंतर्गत विकास योजनेतील आरक्षित जमिनींचे संपादन करताना भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (यात यापुढे "उक्त भूसंपादन अधिनियम, २०१३" म्हणून संबोधलेला) मधील ४ ते १५ या कलमांना सूट देण्यात आली आहे व सदरचा अध्यादेश महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक ३१ डिसेंबर २०१५ रोजी प्रसिद्ध झालेला आहे ;

तसेच आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाचा शासन निर्णय क्रमांक टीपीएस-१८१९/१७९६/प्र.क्र.२९८/१८/नवि-१३, दिनांक ८ मार्च २०१९ अन्वये "उक्त महाराष्ट्र अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार सुरू करण्यात आलेल्या भूसंपादन प्रकरणांमध्ये उक्त महाराष्ट्र अधिनियम, १९६६ च्या कलम १२५ ते १२६ मधील तरतूद विचारात घेता उक्त भूसंपादन अधिनियम, २०१३ चे कलम ११ *(१)*, कलम १६ ते १८ यासोबतच परिशिष्ट दोन व तीन, तसेच या अनुषंगिक कलमे लागू होणार नाहीत" अशा सूचना दिल्या आहेत आणि म्हणून यासोबतच्या अनुसूची-तीनमधील पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन व अनुसूची-चारमधील पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश निरंक आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनींच्या संपादनापोटी द्यावयाच्या उक्त भूसंपादन अधिनियमानुसारची नुकसानभरपाईची रक्कम व तद्अनुषंगिक भूसंपादनाच्या खर्चाची रक्कम संपूर्णपणे उक्त महानगरपालिकेने अदा करावयाची आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६, पोट-कलम *(२)* मध्ये विनिर्दिष्टीत केलेली कालमर्यादा उलटून गेलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनींची अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक असल्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांची खात्री झाली आहे.

त्याअर्थी, राज्य शासनाने प्रदत्त केलेल्या शक्तीनुसार आणि महाराष्ट्र अधिनियम, १९६६ चे कलम १२६, पोट-कलम *(४)* सह उक्त भूमी संपादन अधिनियम, २०१३ चे कलम १९ च्या पोट-कलम *(१)* च्या तरतुदींन्वये, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनींची अनुसूची-दोनमध्ये नमूद सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि त्याअर्थी, उक्त भूमी संपादन अधिनियम, २०१३ च्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त भूमी संपादन अधिनियम, २०१३ अन्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी भूमी संपादन, विशेष अधिकारी, विशेष घटक क्रमांक २, पिंपरी, पुणे-४११ ०१८ यांस पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची - एक

संपादित करावयाच्या जमिनींचे वर्णन

जिल्हा पुणे, तालुका हवेली, गाव मौजे दिघी

अ.क्र.	सर्व्हे नंबर	संयुक्त मोजणी नकाशा व क्षेत्र विवरणपत्रानुसार भूसंपादनाखालील क्षेत्र	कब्जेदाराचे नाव	TDR/FSI/ खाजगी तडजोडी-द्वारे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने यापूर्वीच परस्पर ताब्यात घेतलेले क्षेत्र	भूसंपादनाखालील निव्वळ क्षेत्र	चतु:सीमा
१	२	३	४	५	६	७
१.	२० चा (भाग)	१००० चौ.मी.	अधिकार अभिलेखाप्रमाणे.	२४१.५० चौ.मी.	७५८.५० चौ.मी.	पूर्व : सर्व्हे नं. २० चा उर्वरित भाग. पश्चिम : सर्व्हे नं. २० चा उर्वरित भाग. दक्षिण : सर्व्हे नं. २० चा उर्वरित भाग. उत्तर : सर्व्हे नं. २० चा उर्वरित भाग.

अनुसूची - दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव :- मौजे दिघी, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील जमीन सर्व्हे नंबर २० चा (भाग), या मिळकतीमधील क्षेत्र, "आरक्षण क्र. २/१३८, सांस्कृतिक केंद्र" या सार्वजनिक प्रयोजनासाठी भूसंपादन.

प्रकल्पाच्या कामाचे वर्णन :- आरक्षण क्र. २/१३८, सांस्कृतिक केंद्र.

समाजाला होणारा लाभ :- पायाभूत सुविधा, सोयी-सुविधा (आर्थिक, रोजगार, पायाभूत सुविधा, सोयी-सुविधा याबाबत व इतर लाभांसंबंधात).

प्रकल्पाखालील जागेची सद्य:स्थिती :- १ कच्चे बांधकाम, उर्वरित जागा मोकळी आहे.

अनुसूची - तीन

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

जिल्हा पुणे, तालुका हवेली, गाव मौजे दिघी

अनुक्रमांक	सर्व्हे नंबर	अंदाजित क्षेत्र (हेक्टरमध्ये)

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन निरंक असे

महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने जा. क्र. टीपीएस-१८१९/१७९६/प्र.क्र.२९८/१८/नवि-१३, दिनांक ८ मार्च २०१९ अन्वये, "उक्त महाराष्ट्र प्रादेशिक नियाजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या अधिनियमामधील तरतुदीनुसार सुरू करण्यात आलेल्या भूसंपादन प्रकरणांमध्ये उक्त अधिनियमातील कलम १२५ ते १२६ मधील तरतूद विचारात घेता नवीन भूसंपादन कायद्यातील कलम ११ *(१)*, कलम १६ ते १८ यासोबतच परिशिष्ट-दोन व तीन, तसेच यानुषंगिक कलमे लागू होणार नाहीत" अशा सूचना दिल्या आहेत.

अनुसूची - चार

(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश निरंक असे

टीप :- उक्त अनुसूचित नमूद जमिनींचे नकाशा भूमी संपादन, विशेष अधिकारी, विशेष घटक क्र. २, पिंपरी, पुणे-४११ ०१८, संत तुकारामनगर, श्री. शिवछत्रपती शिवाजी महाराज, पिंपरी-चिंचवड, महानगरपालिका, गोल मंडई इमारत, दुसरा मजला, पिंपरी, पुणे-४११ ०१८, यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळात पाहण्याकरिता उपलब्ध आहेत.

जितेंद्र डूडी,

पुणे, ७ जुलै २०२५. जिल्हाधिकारी, पुणे.

जिल्हा पुणे

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२६ पोट-कलम (४) सह भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम १९ अन्वये जिल्हाधिकारी, पुणे यांनी केलेली अंतिम घोषणा.

घोषणा पत्र

नमुना १-अ

क्रमांक पीएलए/कावि/१४१६/२०२५.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या (सन १९६६ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७) (यात यापुढे "उक्त नगर रचना अधिनियम" म्हणून संबोधिलेला) च्या कलम ३१, पोट-कलम *(१)* अन्वये लोणावळा नगरपरिषदेची द्वितीय सुधारित विकास योजना (यात यापुढे "उक्त सुधारित विकास योजना" म्हणून संबोधिलेली) शासनाचे नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८९६/७५१/सीआर-८२/९६/यूडी-७, दिनांक २९ जून २००५ अन्वये मंजूर झाली असून, ती दिनांक २७ ऑगस्ट २००५ पासून अमलात आलेली आहे. सदरहू अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक--पुणे विभागीय पुरवणीत दिनांक २८ जुलै २००५ रोजी प्रसिद्ध झालेली आहे.

आणि ज्याअर्थी, सोबतच्या अनुसूची-एकमध्ये नमूद केलेल्या जमिनी (यापुढे "उक्त जमिनी" म्हणून संबोधिलेल्या) उक्त मंजूर दुसरी सुधारित विकास योजनेतील आरक्षण क्रमांक ५४, औद्योगिक वसाहत (यात यापुढे "उक्त सार्वजनिक प्रयोजन" म्हणून संबोधिलेल्या) या आरक्षणाच्या प्रस्तावाने बाधित होत आहेत ;

आणि ज्याअर्थी, लोणावळा नगरपरिषदेवर (यात यापुढे "उक्त नगरपरिषद" म्हणून संबोधिलेली) उक्त नगर रचना अधिनियमाचे कलम १२७ नुसार खरेदी सूचना बजावलेली आहे व उक्त नगरपरिषदेने उक्त नगर रचना अधिनियमाचे कलम १२६, पोट-कलम *(१)* अन्वये उक्त जमिनी उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादन करण्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे दिनांक ३१ मे २०२४ रोजी पत्र क्रमांक लो.न.प.-०९/स.क्र.४०/२/अ/वा.नांगर/आ.क्र.-५४/२०२४-२५/२२० अन्वये प्रस्ताव सादर केलेला आहे ;

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभागाने, उक्त नगर रचना अधिनियमाच्या कलम १५१, पोट-कलम *(१)* अन्वयेची अधिसूचना क्रमांक टीपीएस-२१७५/५१०५/नवि-७, दिनांक ३ मार्च १९७९ अन्वयेनुसार उक्त मंजूर सुधारित विकास योजनेत सार्वजनिक प्रयोजनासाठी विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या जमिनींच्या संपादनाबाबतच्या उक्त नगर रचना अधिनियमाच्या कलम १२६, पोट-कलम *(१), (२)* व *(४)* खालील राज्य शासनाने वापरावयाच्या शक्ती त्या-त्या जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेल्या आहेत ;

आणि ज्याअर्थी, संपादनाखालील क्षेत्र मंजूर विकास योजनेतील आखणीनुसार संपादित होत असल्याबाबत खातरजमा करण्याची जबाबदारी, तसेच आरक्षणाची आखणी व संपादनांतर्गत जागेच्या सर्व्हे नंबरमधील हद्दीबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी लोणावळा नगरपरिषदेची आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त नगर रचना अधिनियमाच्या कलम १२५ मध्ये सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम ५ *(१)* अन्वये दाखल मजकूर व ५ *(२)* अन्वये दाखल परंतुकानुसार उक्त नगर रचना अधिनियमांतर्गत विकास योजनेतील आरक्षित जमिनींचे संपादन करताना भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (यात यापुढे "उक्त भूसंपादन अधिनियम" म्हणून संबोधलेला) मधील कलम ४ ते १५ (दोन्हीसह) यामध्ये विनिर्दिष्ट केलेले कार्यपद्धती, अशा जमिनींचे संबंधात लागू होणार नाहीत, तसेच महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने जा.क्र. टीपीएस-१८१९/१७९६/प्र.क्र.२९८/१८/नवि-१३, दिनांक ८ मार्च २०१९ अन्वये, "उक्त नगर रचना अधिनियमामधील कलम १२५ ते १२६ मधील तरतूद विचारात घेता नवीन भूसंपादन कायद्यातील कलम ११ *(१),* कलम १६ ते १८ यासोबतचे परिशिष्ट दोन व तीन, तसेच या अनुषंगिक कलमे लागू होणार नाहीत", अशा मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत आणि म्हणून यासोबतच्या अनुसूची-तीनमधील पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन व अनुसूची-चारमधील पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश या अनुसूची लागू नाही ;

आणि ज्याअर्थी, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनींची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या दुसरी सुधारित विकास योजनेतील आरक्षण क्रमांक ५४, औद्योगिक वसाहतीसाठी आरक्षित केलेल्या जमिनींची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे अशी मा. जिल्हाधिकारी, पुणे यांची खात्री झाली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनींच्या संपादनापोटी द्यावयाच्या उक्त भूसंपादन अधिनियमानुसारची नुकसान भरपाईची संपूर्णत: रक्कम व तद्अनुषंगिक भूसंपादनाच्या खर्चाची रक्कम संपूर्णपणे उक्त नगरपरिषदेने अदा करावयाची आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त नगर रचना अधिनियमाच्या कलम १२६, पोट-कलम *(२)* मध्ये विनिर्दिष्ट केलेली घोषणा करावयाची कालमर्यादा उलटून गेलेली आहे.

आणि त्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभागाने, उक्त नगर रचना अधिनियमाच्या कलम १५१, पोट-कलम *(१)* अन्वयेची अधिसूचना क्र. टीपीएस-२१७५/५१०५/नवि-७, दिनांक ३ मार्च १९७९ नुसार शासनाने प्रदत्त केलेल्या अधिकाराचा वापर करून आणि उक्त नगर रचना अधिनियमाच्या कलम १२६, पोट-कलम *(४)* सह उक्त भूसंपादन अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम *(१)* च्या तरतुदीन्वये यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये तपशीलवार वर्णन केलेल्या व अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या उक्त जमिनी उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहेत, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

उक्त भूसंपादन अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम *(छ)* अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, पुणे यांनी उक्त भूसंपादन अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्याकरिता, विशेष भूमी संपादन अधिकारी, क्रमांक १४, पहिला मजला, ए विंग, जिल्हाधिकारी कार्यालय इमारत, पुणे-४११ ००१ (यात यापुढे "भूसंपादन अधिकारी" म्हणून संबोधिलेला) यांस पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची - एक

संपादित करावयाच्या जमिनींचे वर्णन

जिल्हा पुणे, तालुका मावळ, गावाचे नाव - मौजे नांगरगाव

अ.क्र.	गट नंबर / सर्व्हे नंबर	संयुक्त मोजणी नकाशा व विवरण-पत्रानुसार संपादन करावयाचे क्षेत्र (हे. आर)		कब्जेदाराचे नाव	चतु:सीमा
		एकूण क्षेत्र (हे.आर)	खराबा		
१	२	३	४	५	६
१.	४०/२/अ	००.३४.१०	००.०१.००	श्रीमती अनिता अभय पारख	पूर्व : लागू, सर्व्हे नं. ३९. पश्चिम : लागू, सर्व्हे नं. ३७. उत्तर : लागू, सर्व्हे नं. ४०/१. दक्षिण : लागू, सर्व्हे नं. ४०/२ब+३.

अनुसूची - दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव : मौजे नांगरगाव, तालुका मावळ, जिल्हा पुणे येथील गट नंबर ४०/२/अ येथील "आरक्षण क्रमांक ५४, औद्योगिक वसाहत" या आरक्षणासाठी भूसंपादन करणेबाबत.

प्रकल्पाच्या कामाचे वर्णन : आरक्षण क्रमांक ५४, औद्योगिक वसाहत.

समाजाला होणारा लाभ : सदरची जागा ही शहरातील औद्योगिक इस्टेट लगत असल्याने औद्योगिक वसाहतीकरिता आवश्यक आहे.

प्रकल्पाखालील जागेची सद्य:स्थिती. : गट नंबर / सर्व्हे नंबर ४०/२/अ मध्ये संपूर्ण जागा मोकळी आहे.

अनुसूची - तीन

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन -- लागू नाही.

महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने जा. क्रमांक टीपीएस-१८१९/१७९६/प्र.क्र.२९८/१८/नवि-१३, दिनांक ८ मार्च २०१९ अन्वये "उक्त नगर रचना अधिनियम, १९६६ मधील कलम १२५ ते १२६ मधील तरतूद विचारात घेता नवीन भूसंपादन कायद्यातील कलम ११ *(१)* कलम १६ ते १८ यासोबतच परिशिष्ट - दोन व तीन, तसेच यानुषंगिक कलमे लागू होणार नाहीत" अशा सूचना दिल्या आहेत.

अनुसूची - चार

(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश -- लागू नाही.

टीप :- उक्त जमिनींचा नकाशा निरीक्षण, विशेष भूमी संपादन अधिकारी, क्रमांक १४, पहिला मजला, ए विंग, जिल्हाधिकारी कार्यालय इमारत, पुणे-४११ ००१ या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

जितेंद्र डूडी,

पुणे, ३० जुलै २०२५. जिल्हाधिकारी, पुणे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२६ पोट-कलम (४) सह भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम १९ अन्वये जिल्हाधिकारी, पुणे यांनी केलेली अंतिम घोषणा.

घोषणा पत्र

नमुना १-अ

क्रमांक पीएलए/कावि/१४१७/२०२५.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या (सन १९६६ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७) (यात यापुढे "उक्त नगर रचना अधिनियम" म्हणून संबोधिलेला) च्या कलम ३१, पोट-कलम *(१)* अन्वये लोणावळा नगरपरिषदेची द्वितीय सुधारित विकास योजना (यात यापुढे "उक्त सुधारित विकास योजना" म्हणून संबोधिलेली) शासनाचे नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८९६/७५१/सीआर-८२/९६/यूडी-७, दिनांक २९ जून २००५ अन्वये मंजूर झाली असून, ती दिनांक २७ ऑगस्ट २००५ पासून अमलात आलेली आहे. सदरहू अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक--पुणे विभागीय पुरवणीत दिनांक २८ जुलै २००५ रोजी प्रसिद्ध झालेली आहे.

आणि ज्याअर्थी, सोबतच्या अनुसूची-एकमध्ये नमूद केलेल्या जमिनी (यापुढे "उक्त जमिनी" म्हणून संबोधिलेल्या) उक्त मंजूर दुसरी सुधारित विकास योजनेतील आरक्षण क्रमांक २९, पार्किंग (यात यापुढे "उक्त सार्वजनिक प्रयोजन" म्हणून संबोधिलेल्या) या आरक्षणाच्या प्रस्तावाने बाधित होत आहेत ;

आणि ज्याअर्थी, लोणावळा नगरपरिषदेवर (यात यापुढे "उक्त नगरपरिषद" म्हणून संबोधिलेली) उक्त नगर रचना अधिनियमाचे कलम १२७ नुसार खरेदी सूचना बजावलेली आहे व उक्त नगरपरिषदेने उक्त नगर रचना अधिनियमाचे कलम १२६, पोट-कलम *(१)* अन्वये उक्त जमिनी उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादन करण्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे दिनांक ५ फेब्रुवारी २०२५ रोजी पत्र क्रमांक लो.न.प.-०९/आरक्षण क्र.२९,पार्किंग/२०२४-२५/११९० अन्वये प्रस्ताव सादर केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभागाने, उक्त नगर रचना अधिनियमाच्या कलम १५१, पोट-कलम *(१)* अन्वयेची अधिसूचना क्रमांक टीपीएस-२१७५/५१०५/नवि-७, दिनांक ३ मार्च १९७९ अन्वयेनुसार उक्त मंजूर सुधारित विकास योजनेत सार्वजनिक प्रयोजनासाठी विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या जमिनींच्या संपादनाबाबतच्या उक्त नगर रचना अधिनियमाच्या कलम १२६, पोट-कलम *(१), (२)* व *(४)* खालील राज्य शासनाने वापरावयाच्या शक्ती त्या-त्या जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेल्या आहेत ;

आणि ज्याअर्थी, संपादनाखालील क्षेत्र मंजूर विकास योजनेतील आखणीनुसार संपादित होत असल्याबाबत खातरजमा करण्याची जबाबदारी, तसेच आरक्षणाची आखणी व संपादनांतर्गत जागेच्या सर्व्हे नंबरमधील हद्दीबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी लोणावळा नगरपरिषदेची आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त नगर रचना अधिनियमाच्या कलम १२५ मध्ये सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम ५ *(१)* अन्वये दाखल मजकूर व ५ *(२)* अन्वये दाखल परंतुकानुसार उक्त नगर रचना अधिनियमांतर्गत विकास योजनेतील आरक्षित जमिनींचे संपादन करताना भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (यात यापुढे "उक्त भूसंपादन अधिनियम" म्हणून संबोधलेला) मधील कलम ४ ते १५ (दोन्हीसह) यामध्ये विनिर्दिष्ट केलेले कार्यपद्धती, अशा जमिनींचे संबंधात लागू होणार नाहीत, तसेच महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने जा.क्र. टीपीएस-१८१९/१७९६/प्र.क्र.२९८/१८/नवि-१३, दिनांक ८ मार्च २०१९ अन्वये, "उक्त नगर रचना अधिनियमामधील कलम १२५ ते १२६ मधील तरतूद विचारात घेता नवीन भूसंपादन कायद्यातील कलम ११ *(१),* कलम १६ ते १८ यासोबतचे परिशिष्ट दोन व तीन, तसेच या अनुषंगिक कलमे लागू होणार नाहीत", अशा मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत आणि म्हणून यासोबतच्या अनुसूची-तीनमधील पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन व अनुसूची-चारमधील पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश या अनुसूची लागू नाही ;

आणि ज्याअर्थी, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनींची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या व दुसरी सुधारित विकास योजनेतील आरक्षण क्रमांक २९, पार्किंगसाठी आरक्षित केलेल्या जमिनींची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे अशी मा. जिल्हाधिकारी, पुणे यांची खात्री झाली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनींच्या संपादनापोटी द्यावयाच्या उक्त भूसंपादन अधिनियमानुसारची नुकसान भरपाईची संपूर्णत: रक्कम व तद्अनुषंगिक भूसंपादनाच्या खर्चाची रक्कम संपूर्णपणे उक्त नगरपरिषदेने अदा करावयाची आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त नगर रचना अधिनियमाच्या कलम १२६, पोट-कलम *(२)* मध्ये विनिर्दिष्ट केलेली घोषणा करावयाची कालमर्यादा उलटून गेलेली आहे.

आणि त्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभागाने, उक्त नगर रचना अधिनियमाच्या कलम १५१, पोट-कलम *(१)* अन्वयेची अधिसूचना क्र. टीपीएस-२१७५/५१०५/नवि-७, दिनांक ३ मार्च १९७९ नुसार शासनाने प्रदत्त केलेल्या अधिकाराचा वापर करून आणि उक्त नगर रचना अधिनियमाच्या कलम १२६, पोट-कलम *(४)* सह उक्त भूसंपादन अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम *(१)* च्या तरतुदीन्वये यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये तपशीलवार वर्णन केलेल्या व अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या उक्त जमिनी उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहेत, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

उक्त भूसंपादन अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम *(छ)* अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, पुणे यांनी उक्त भूसंपादन अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्याकरिता, विशेष भूमी संपादन अधिकारी, क्रमांक १४, पहिला मजला, ए विंग, जिल्हाधिकारी कार्यालय इमारत, पुणे-४११ ००१ (यात यापुढे "भूसंपादन अधिकारी" म्हणून संबोधिलेला) यांस पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची - एक

संपादित करावयाच्या जमिनींचे वर्णन

जिल्हा पुणे, तालुका मावळ, गावाचे नाव - मौजे लोणावळा

अ.क्र.	सि.स.नं.	संयुक्त मोजणी नकाशा व विवरणपत्रा-नुसार संपादन करावयाचे क्षेत्र (चौ.मी.)	कब्जेदाराचे नाव	झाडे	चतु:सीमा	शेरा
१	२	३	४	५	६	७
१.	२०८/अ	१३९४.९८	१. पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण. २. के. डी. ॲण्ड मुकेश मल्टिकॉन एलएलपी तर्फे भागीदार मुकेश यू. भंडारी, के. डी. ॲण्ड मुकेश मल्टिकॉन एलएलपी तर्फे भागीदार अनिल डी. ओसवाल.	आंबा १ पिवळा-चाफा १ उंबर १ सायर १ जंगली भेंडी २	पूर्व : लागू, रेल्वे लाईन. पश्चिम : लागू रस्ता. उत्तर : सि.स.नं. २०८ पै. दक्षिण : लागू रस्ता.	मिळकत पत्रिकेवर दिनांक २९ ऑक्टोबर २००७ चे नोंदीत रजि. पाटणी अन्वये, र.द.क्र. ४५२९/०७, दि. ४ ऑक्टोबर २००७ अन्वये मोहनदास गोविंददास मजेठिया यांचा हिस्सा कमी केला असून अभयकुमार झुंबरलाल पारख व लिलाबाई झुंबरलाल पारख यांचे हिस्सेवर कायम केले असे. म.ज.म.अ. १९६६ चे कलम २५८ अन्वये दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

अनुसूची - दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव : मौजे लोणावळा डी, तालुका मावळ, जिल्हा पुणे येथील सि.स.नं. २०८/अ येथील "आरक्षण क्रमांक २९, पार्किंग" या आरक्षणासाठी भूसंपादन करणेबाबत.

प्रकल्पाच्या कामाचे वर्णन : आरक्षण क्रमांक २९, पार्किंग.

समाजाला होणारा लाभ : सदर प्रस्तावित पार्किंगची जागा ही शहरातील मुख्य बाजार पेठेत असल्याने या ठिकाणी वाहनतळ केल्याने वाहतूक कोंडी कमी होणार आहे.

प्रकल्पाखालील जागेची सद्य:स्थिती : सि.स.नं. २०८/अ मध्ये ६ झाडे असून उर्वरित जागा मोकळी आहे.

अनुसूची - तीन

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन -- लागू नाही.

महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने जा. क्रमांक टीपीएस-१८१९/१७९६/प्र.क्र.२९८/१८/नवि-१३, दिनांक ८ मार्च २०१९ अन्वये "उक्त नगर रचना अधिनियम, १९६६ मधील कलम १२५ ते १२६ मधील तरतूद विचारात घेता नवीन भूसंपादन कायद्यातील कलम ११ *(१)* कलम १६ ते १८ यासोबतच परिशिष्ट - दोन व तीन, तसेच यानुषंगिक कलमे लागू होणार नाहीत" अशा सूचना दिल्या आहेत.

अनुसूची - चार

(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश -- लागू नाही.

टीप :- उक्त जमिनींचा नकाशा निरीक्षण, विशेष भूमी संपादन अधिकारी, क्रमांक १४, पहिला मजला, ए विंग, जिल्हाधिकारी कार्यालय इमारत, पुणे-४११ ००१ या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

जितेंद्र डूडी,

पुणे, ३० जुलै २०२५. जिल्हाधिकारी, पुणे.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांजकडून

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३-क अन्वये

झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश

क्रमांक झो.पु.प्रा./सप्रा-२/२२४१/२०२५.— जुना फा. प्लॉट क्रमांक १५, टी. पी. स्कीम नंबर १, नवीन फा. प्लॉट क्रमांक २४, एरंडवणा, पुणे येथील अनुसूचित नमूद केलेल्या क्षेत्रांसंदर्भात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३ *(क)* अंतर्गत खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३ *(क)* मध्ये नमूद तरतुदीनुसार "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून घोषित करण्याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे हे सक्षम आहेत ;

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दिनांक ११ एप्रिल २०२५ रोजीची पूर्वसूचना प्रकरणातील सविस्तर पार्श्वभूमी नमूद करून महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-पुणे विभागीय पुरवणीमध्ये, गुरुवार ते बुधवार, मे ८-१४, २०२५/वैशाख १८-२४, शके १९४७ मधील पृष्ठे ८ ते ९ वर, तसेच दैनिक वृत्तपत्रात दिनांक ८ मे २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे, तसेच सदरची पूर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसून येईल अशा प्रत्यक्ष जागेवर दिनांक १६ एप्रिल २०२५ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, सदर पूर्वसूचनेची प्रत जागामालक / विकसक यांना व एक प्रत मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांना देण्यात आली आहे आणि उक्त पूर्वसूचनेद्वारे जागामालक किंवा इतर यांना त्यांच्या ज्या काही सूचना / हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत या कार्यालयाकडे सादर करणेबाबत फर्माविण्यात आले होते. प्राप्त हरकत / आक्षेप अर्जाच्या अनुषंगाने हरकतदार व योजनेचे विकसक यांची उक्त अधिनियमातील तरतुदीअन्वये सुनावणी घेऊन त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली आणि सुनावणी अंती दोन्ही उभय पक्षकार यांचे तोडी युक्तिवाद विचारात घेऊन त्याबाबतचे स्वतंत्र निकालपत्र पारित करण्यात आले असून हरकतदार यांचा हरकत / आक्षेप अर्ज दिनांक १८ जुलै २०२५ रोजीच्या आदेशान्वये फेटाळण्यात आला आहे.

त्याअर्थी, उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करता महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ च्या कलम ३ *(क)* मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येत आहेत.

आदेश :--

सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्यासंदर्भातील दिनांक ११ एप्रिल २०२५ रोजीची जाहीर नोटिस (झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याची पूर्वसूचना) कायम करून खालील अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून अंतिमत: घोषित करण्यात येत आहे.

सदरच्या आदेशाविरोधात उक्त अधिनियमाच्या कलम ३ *(क)* मधील तरतुदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई येथे अपील दाखल करणे शक्य आहे.

अनुसूची

महानगरपालिका क्षेत्र : पुणे महानगरपालिका.

झोपडपट्टीचे नाव : जुना फा. प्लॉट १५, टी. पी. स्कीम नं. १, नवीन फा. प्लॉट २४, एरंडवणा, कर्वेरोड, पुणे

गाव :- एरंडवणा, पुणे.

सर्व्हे नंबर / सि.स.नं. / फा.प्लॉट क्र.	जमीन / भोगवटादाराचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव	क्षेत्र (चौ.मी.)	योजना क्षेत्राची चतु:सीमा			
			पूर्वेस	दक्षिणेस	पश्चिमेस	उत्तरेस
१	२	३	४	५	६	७
जुना फा. प्लॉट क्र. १५, टी.पी. स्कीम नंबर १, नवीन फा. प्लॉट क्र. २४.	पुणे महानगरपालिका	११९३९.५२ चौ.मी.	फा. प्लॉट क्रमांक २४ पैकी.	रस्ता व नदी	फा. प्लॉट क्रमांक १५.	रस्ता

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

नीलेश र. गटणे (भा.प्र.से.),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे.

पुणे, २१ जुलै २०२५.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे

(झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याची पूर्वसूचना)

जाहीर नोटिस

क्रमांक झो.पु.प्रा./सप्रा-२/झोपुआ/संगमवाडी/२२४६/२०२५.—ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे "उक्त अधिनियम" असा करणेत आला आहे) चे कलम ३-अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झो.प.सु.-१, दिनांक ३० जून २००५ अन्वये पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३-ब मधील तरतुदीनुसार पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करण्यात आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दिनांक १ डिसेंबर २००५ रोजी अंतिमत: प्रसिद्ध करण्यात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याचे या कार्यालयाचे नियोजन आहे ;

आणि ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीचे मालमत्ता पत्रकानुसार एकूण क्षेत्र ३७०००.०० चौ.मी. व त्रिमितीय पद्धतीने केलेल्या परिगणनेनुसार सदर क्षेत्र २०८०.३० चौ.मी. इतके असल्याचे उपअधीक्षक, भूमी अभिलेख, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी दिनांक ३० जून २०२५ रोजीच्या अहवालाने स्पष्ट केल्यामुळे सदर योजनेकरिता कमीतकमी क्षेत्र २०८०.३० चौ.मी. क्षेत्र विचारात घेण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी त्यांच्याकडील पत्र क्र. क्षेआप-२/९८२, दिनांक २२ मे २०२५ अनव्ये सदर जागेसंदर्भात महानगरपालिकेच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडील वस्तुस्थिती दर्शक अहवाल सादर करून झोपडपट्टी सदृश परिस्थिती असल्याने कळवले आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा), २०१७ मधील तरतुदी विचारात घेता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करताना "कोणतीही झोपडपट्टी योजना प्रसिद्ध झाल्यानंतर यथाशिघ्र मुख्य कार्यकारी अधिकारी, कोणत्याही जमिनींच्या बाबतीत मग ती पूर्वी झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित झालेली असो किंवा नसो व ज्या सामुहिक आर्थिक कार्यक्षेत्राचा अंतर्भाव करता येईल ती जमीन झोपडपट्टी

पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केले जाणे समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबदल त्याची खात्री पटल्यावर कोणतीही सार्वजनिक प्राधिकरणे किंवा राज्य विधी मंडळाने अधिनियम केलेल्या कोणत्याही कायद्यान्वये गठीत केलेल्या राज्य शासनाच्या स्थानिक संस्था यांसह जमीन मालकांना ३० दिवसांची नोटिस आणि त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे आणि त्यानंतर ४५ दिवसांच्या आत अशी जमीन "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून घोषित करील" असे नमूद केले आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारित अधिनियम, २०१७) चे कलम ३ *(क)* नुसार "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून घोषित करणेकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे हे सक्षम आहेत ;

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमूद क्षेत्रावर झोपडपट्टी असलेने सदरचे क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३ *(क)* च्या तरतुदीनुसार खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेले क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याचे प्रस्तावित असून खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

आदेश :--

(१) अनुसूचीमध्ये नमूद क्षेत्रावर झोपडपट्टी असलेने व ती महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये घोषित असलेने सदरचे क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

(२) अनुसूचीमध्ये निर्दिष्ट क्षेत्राचे जमीनमालक अथवा मालकी हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती / संस्था यांना त्यांच्या ज्या काही सूचना / हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत लेखी स्वरूपात सक्षम प्राधिकारी क्र. २, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांच्याकडे सादर करण्यास फर्मविण्यात येत आहे. अशा सूचना व हरकती विचारात घेऊन या प्रकरणी ४५ दिवसांचे आत हे क्षेत्र उक्त कलमाखाली "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून घोषित करण्याचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे यांचेमार्फत घेण्यात येईल.

अनुसूची

महानगरपालिका क्षेत्र : पुणे महानगरपालिका.

झोपडपट्टीचे नाव : सर्व्हे नंबर ६० पै., ६१ पै., सि.स.नं.३३५४ पै., ३३५५ पै., राजीव गांधीनगर, संगमवाडी गावठाण, येरवडा, पुणे.

गाव :- येरवडा, पुणे.

सर्व्हे नंबर / सि.स.नं. / फा.प्लॉट क्र.	जमीन / भोगवटादाराचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव	क्षेत्र (चौ.मी.)	योजना क्षेत्राची चतु:सीमा			
			पूर्वेस	दक्षिणेस	पश्चिमेस	उत्तरेस
१	२	३	४	५	६	७
सर्व्हे नं. ६० पै., ६१ पै., सि.स.नं. ३३५४ पै., ३३५५ पै.	पुणे महानगरपालिका	२०८०.३० चौ.मी.	रस्ता	सर्व्हे नं. ५९ पै.	सर्व्हे नं. ६० पै., ६१ पै.	रस्ता

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

नीलेश र. गटणे (भा.प्र.से.),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे.

पुणे, २१ जुलै २०२५.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ (ड) सह कलम १२ अन्वये

झोपडपट्टी निर्मूलन आदेश

क्रमांक झो.पु.प्रा./सप्रा-३/झो.नि.आ./१९७९/२०२५.— ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे "उक्त अधिनियम" असा करणेत येत आहे) चे कलम ३-अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दिनांक ३० जून २००५ अन्वये पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे.

ज्याअर्थी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमूद सि.स.नं. ५२२७ पै., ५२२९ पै., (स. नं. ६१ पै.), खंडोबा माळ, आकुर्डी, पुणे या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टीचे क्षेत्रफळ ६६८८.४७ चौ. मी. या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र शासन) मालकीच्या जागेवर (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे "सदर क्षेत्र" असा करणेत येत आहे) झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. वाकडकर पाटील असोसिएट्स यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रस्ताव दाखल केलेला आहे. सदर प्रकरणी महानगरपालिकेने राबविलेल्या प्रकल्पाव्यतिरिक्त उर्वरित जागेवर अधिनियमाच्या कलम ३ *(क)* नुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र निर्धारित करण्याबाबत दिनांक १३ मार्च २०२४ रोजी आदेश पारित केले आहेत व सदर प्रस्तावास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचेकडील विकास नियंत्रण नियमावली, २०२२ यातील नियम क्र. १४.६.१२ (१) च्या तरतुदीनुसार प्रशासकीय मान्यता दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या आदेशान्वये देण्यात आली आहे.

ज्याअर्थी, सदर क्षेत्रातील झोपडपट्टीचे सर्वेक्षण करण्यात येऊन झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट-दोन) तयार करून दिनांक १७ जुलै २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली असून उक्त परिशिष्ट-दोननुसार सदर मिळकतीवर एकूण २३१ झोपड्या असून त्यापैकी (मोफत पुनर्वसनाकरिता १२४ व सशुल्क पुनर्वसनाकरिता ६) याप्रमाणे एकूण १३० झोपडीधारक पुनर्वसनास पात्र ठरले आहेत ;

ज्याअर्थी, सदर मिळकतीकरिता महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३-क अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र निर्धारित करणारा अंतिम आदेश दिनांक १३ मार्च २०२४ रोजी पारित करणेत आला आहे. सदरचा आदेश महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-पुणे विभागीय पुरवणीमध्ये, शुक्रवार, मार्च १५, २०२४ रोजीच्या राजपत्रात पृष्ठे ४ व ५, तसेच स्थानिक वृत्तपत्रात दिनांक १६ मार्च २०२४ रोजी प्रसिद्ध करणेत आला आहे.

ज्याअर्थी, उक्त झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणाऱ्या अंतिम आदेशास मा. शिखर तक्रार निवारण समिती, मुंबई अथवा कोणत्याही न्यायालयाची स्थगिती नाही आणि म्हणून, सदर क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकामी या क्षेत्रातील सर्व इमारती / झोपड्या पाडून सदरचे क्षेत्र रिकामे करणे व उक्त अधिनियमाच्या कलम ३-ड सहकलम १२ अन्वये पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे.

ज्याअर्थी, विकसक मे. वाकडकर पाटील असोसिएट्स यांनी सर्व झोपडीधारकांना भाडे देऊन त्यांना तात्पुर्ती सोय करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. तरी संक्रमणाची सर्व जबाबदारी आमची राहील. झोपडीधारकांना झोपडपट्टी पुनर्वसन कार्यालयाकडून जे भाडे देय असेल ते विकसक म्हणून आम्ही देणेची हमी आम्ही देत आहोत, तसेच याबाबत भविष्यात काही वाद विवाद झाल्यास त्याचे निराकरण आम्ही करू व त्याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण कार्यालयास कोणतीही तोशीष लागू देणार नाही असे रुपये ५०० च्या मुद्रकावरील दिनांक १८ जुलै २०२५ रोजीचे हमीपत्र या कार्यालयाकडे सादर केले आहे. यासंदर्भात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या नगर रचना विभागाने संक्रमण व्यवस्थेसाठी प्रती पात्र झोपडीधारक प्रतीमाह किमान रुपये ६,५०२ इतके भाडे निर्धारित केले असून प्राधिकरणाकडील परिपत्रक क्र. १०, दिनांक १२ डिसेंबर २०२३ व शुद्धिपत्रक क्र. १, दि १४ फेब्रुवारी २०२५ नुसार निष्कासनापूर्वी एक वर्षाचे भाडे अग्रिम स्वरूपात व त्यानंतर पुनर्वसन सदनिकेचा ताबा देईपर्यंत प्रत्येक वर्षाच्या सुरूवातीस पुढील एक वर्षाचे आगाऊ भाडे सर्व पात्र झोपडीधारकांना विकसकाने अदा करणे अनिवार्य आहे.

त्याअर्थी, झोपडपट्टी पुनर्वसन अधिनियमातील व विकास नियंत्रण नियमावलीतील सर्व तरतुदींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून योजनेअंतर्गत पुढील कामकाज पार पाडणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाल्याने व अधिनियमांतर्गत अशी कार्यवाही करण्यास सक्षम असल्याने मी, नीलेश र. गटणे (भा.प्र.से.), मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे झोपडपट्टी अधिनियमाच्या कलम ३-ड सहकलम १२ *(१)* नुसार खालीलप्रमाणे झोपडपट्टी निर्मूलन आदेश पारित करत आहे.

आदेश :--

(१) खालील अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे "झोपडपट्टी निर्मूलन क्षेत्र" म्हणून घोषित करीत आहे.

(२) सदर क्षेत्रावरील प्रत्येक झोपडी व बांधकामामधील झोपडीधारकांनी उक्त अधिनियमाच्या कलम १२ *(१)* अन्वये ३० दिवसांचे आत त्यांची झोपडी रिकामी करून झोपडी व त्याखालील जागा विकसक यांचे ताब्यात द्यावी.

(३) अशा रीतीने रिकामी झालेली झोपडी / बांधकाम, उक्त विकसकाने उक्त अधिनियमाच्या कलम १२ *(१)* अन्वये या आदेशाचे दिनांकापासून ५० दिवसांचे आत पाडून टाकून जमीन मोकळी करावी व संक्रमण व्यवस्थेसंदर्भातील अन्य निवासी व्यवस्थेचा विकल्प निवडून तात्काळ स्थलांतरित व्हावे.

(४) उक्त अधिनियमाच्या कलम १२ *(८)* अन्वये उपरोक्त नमूद मुदत संपण्यापूर्वी इमारत पाडून टाकण्यात आली नसल्यास इमारतीत प्रवेश करण्याचे व इमारत पाडून टाकण्याचे, तसेच इमारतीमधील सामानाची विक्री करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अथवा त्यांनी प्राधिकृत करतील अशा अधिकाऱ्यास राहतील.

(५) कोणत्याही झोपडीधारकाने विहित मुदतीत त्याची झोपडी रिकामी न केल्यास अथवा झोपडीधारकाची योजनेस संमती नसल्यास अथवा झोपडीधारकास योजना मान्य नसल्यास असा झोपडीधारक, मग तो पात्र असो अथवा अपात्र, उक्त अधिनियमाच्या कलम ३-झ अन्वये त्याचा पुनर्वसनाचा अधिकार गमावून निष्कासनाच्या कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील.

(६) सदरच्या आदेशाचे पालन करण्यास कसूर करणारी कोणतीही व्यक्ती दोषसिद्धीअंती उक्त अधिनियमातील कलम ३७ अन्वये, ३ महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा १,००० रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्हीस पात्र राहील.

अनुसूची

महानगरपालिका क्षेत्र : पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.

झोपडपट्टीचे नाव : सि.स.नं. ५२२७ पै., ५२२९ पै. (सर्व्हे नं. ६१ पै.), खंडोबा माळ, आकुर्डी, जिल्हा पुणे.

गाव :- आकुर्डी, जिल्हा पुणे.

सर्व्हे नंबर / सि.स.नं. / फा.प्लॉट क्र.	जमीन / भोगवटादाराचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव	क्षेत्र (चौ.मी.) त्रिमितीय पद्धतीने	योजना क्षेत्राची चतु:सीमा (न.भू.अ.,पिं.-चिं. तातडी हद्द कायम मो.र.नं.५४६७/२०२४ रोजीच्या मोजणी नकाशानुसार			
			पूर्वेस	दक्षिणेस	पश्चिमेस	उत्तरेस
१	२	३	४	५	६	७
सि.स.नं. ५२२७ पै., ५२२९ पै., (सर्व्हे नं. ६१ पै.), प्लॉट नं. २-अ.	महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ.	६६८८.४७ चौ.मी.	सि.स.नं. ५२२८ पै. लगत.	रस्ता	रस्ता	रस्ता

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

नीलेश र. गटणे (भा.प्र.से.),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे.

पुणे, २३ जुलै २०२५.

मुख्याधिकारी यांजकडून

वाई नगरपरिषद, वाई

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये

जाहीर सूचना

क्रमांक वा.न.प./वशि-८/४११/२०२५-२६.— वाई नगरपरिषदेच्या हद्दीतील सर्व नागरिकांना या जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांच्याकडील अधिसूचना क्र. TPS-१९१६/१२४२/CR-५७५/१६/DP-Sanction/UD-१३, दिनांक १५ मार्च २०१८ ने मंजूर असलेल्या व दिनांक २६ मे २०१८ पासून अमलात आलेल्या वाई नगरपरिषदेच्या विकास योजनेच्या दुसऱ्या सुधारित आराखड्यामध्ये खाली दर्शविण्यात आल्याप्रमाणे दुरुस्ती करणेसाठी नगरपरिषद सर्वसाधारण सभेने वेळोवेळी मंजुरी दिलेली आहे.

त्या ठरावानुसार खालील तपशिलाप्रमाणे नकाशात दुरुस्ती करावयाची आहे.

अ.क्र.	मंजूर विकास योजना (दु.सु.) आराखड्यामधील तपशील	मंजूर विकास योजना (दु.सु.) आराखड्यामध्ये करावयाची सुधारणा (दुरुस्ती) तपशील	नगरपरिषद सर्वसाधारण सभा ठराव
१	२	३	४
१.	वाई शहर मंजूर विकास योजना (दु.सु.) आराखड्यामध्ये सि.स.नं. १०९१/अ/२ ही मिळकत आरक्षण क्र. ४६, "शॉपिंग सेंटर" ने बाधित होत आहे.	वाई शहर मंजूर विकास योजना (दु.सु.) आराखड्यामध्ये सि.स.नं. १०९१/अ/२ ही मिळकत आरक्षण क्र. ४६, "शॉपिंग सेंटर" मधून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्यात यावी.	प्रशासकीय सर्वसाधारण सभा ठराव क्र. १८, दि. १० जुलै २०२५.

नगरपरिषदेच्या विकास योजना (दु.सु.) आराखड्यामधील सदर सुधारणांना (दुरुस्तींना) या नोटिसीने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ अन्वये नागरिकांच्या सूचना व हरकती मागविण्यासाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे. वाई शहरातील नागरिकांनी आपल्या सूचना व हरकती ही नोटिस महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून ३० (तीस) दिवसांच्या आत नगरपरिषदेस प्राप्त झालेल्या सूचना व हरकतींचाच फक्त विचार केला जाईल. वरील तपशिलाप्रमाणे बदल दर्शविणारा नकाशा वाई नगरपरिषदेच्या कार्यालयात ठेवला असून, तो कार्यालयीन वेळेमध्ये नागरिकांना पाहता येईल.

संजीवनी दळवी,
मुख्याधिकारी,
वाई नगरपरिषद, वाई.

वाई, २९ जुलै २०२५.

BY CHIEF OFFICER

Wai Municipal Council, Wai

As per vide Section 37 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966

NOTICE

No. W.N.P./WS-8/411/2025-26.— All citizens residing in Wai Municipal Council area are hereby informed by this Public Notice that Wai Municipal Council, intends to suggest the following Modifications in Sanctioned Development Plan (Second Revision) of Wai which has been sanctioned by the Government Notification No. TPS-1916/1242/CR-575/16/DP-Sanction/UD-13, dated 15th March 2018 and came in force with effect from dated 26th May 2018. By its General Body Resolution of respective dates ;

Proposed Modifications are as given below.

Sr. No.	Proposals of Sanctioned Development Plan (Second Revision)	Modifications Proposed	General Body Resolution
1	2	3	4
1.	In Sanctioned Development Plan (Second Revision) of Wai the land C. T. S. No. 1091/A/2, is included in Site No. 46, “Shopping Centre”.	In Sanctioned Development Plan (Second Revision) of Wai the land C. T. S. No. 1091/A/2, is included in Site No. 46, “Shopping Centre”, is deleted and included Residential Zone.	General Administrative Meeting Resolution No. 18, dated 10th July 2025.

The said Modification in the Sanctioned Development Plan (Second Revision) of Wai Municipal Council, Wai is hereby published under Section 37 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 for inviting suggestions and objections to proposed Modifications. All citizens of Wai are request to send their suggestions and objections in writing to the Wai Municipal Council, Wai within 30 (Thirty) days from date of publication of this Notification in Maharashtra Government Gazette. Suggestions and objections received before expiry of this date of this Notification period only be considered.

A plan showing the Proposed Modifications is available for inspections in the office of Municipal Council, Wai during the office hours.

SANJIVANEE DALAVI,
Chief Officer,
Wai Municipal Council, Wai.

Wai, 29th July 2025.

जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख यांजकडून

वाचा : (१) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील निर्णय क्रमांक आस्थापना-१०९३/प्र. क्र. १९/ल-१, दिनांक १८ ऑगस्ट १९९४.

(२) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१३/मातंक, दिनांक २२ फेब्रुवारी २०१९.

(३) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे यांचेकडील अधिसूचना क्रमांक गावठाण/अधिसूचना/एस.व्ही.सी.आर.-४३२४/स-४/१९९४, पुणे, दिनांक २३ सप्टेंबर १९९४.

(४) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे यांचेकडील परिपत्रक क्रमांक गावठाण/ड्रोन सर्व्हे/प्र.क्र.३९/२०२१, दिनांक २५ जानेवारी २०२१.

(५) उपअधीक्षक, भूमी अभिलेख, करमाळा यांचेकडील पत्र जा. क्र. ४५९/न.भू.शि./परिरक्षण प्रस्ताव/२५, दिनांक २४ जून २०२५.

अधिसूचना

क्रमांक न.भू.शि./गाव.अधि.मं./कावि-१४८/१९४८/२०२५.— महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील निर्णय क्रमांक आस्थापना-१०९३/प्र.क्र.१९/ल-१, दिनांक १८ ऑगस्ट १९९४ चे शासन निर्णयानुसार भूमी अभिलेख विभागाची तालुका स्तरावर पुनर्रचना करणेत आलेली आहे, त्याअनुषंगाने जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे यांचेकडील अधिसूचना क्रमांक एस.व्ही.सी.आर.-४३२४/स-४/१९९४, दिनांक २३ सप्टेंबर १९९४ अन्वये पुणे विभागातील सजांची पुनर्रचना करणेत आली असून सजांची गावे व मिळकती कायम करणेत आलेल्या आहेत.

महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१३/मातंक, दिनांक २२ फेब्रुवारी २०१९ अन्वये राज्यात जमाबंदी प्रकल्प राबविण्यास मान्यता दिली आहे.

उपअधीक्षक, भूमी अभिलेख, करमाळा यांनी त्यांचेकडील प्रस्तावामध्ये त्यांचे अधिनस्त सजा करमाळामध्ये मौजे (१) रोशेवाडी, (२) घारगाव, (३) हिवरवाडी, व सजा जेऊरमध्ये मौजे (१) जेऊरवाडी, (२) हिंगणी व सजा वीटमध्ये मौजे (१) खडकेवाडी, (२) धायखिंडी, (३) घरतवाडी, (४) वडाचीवाडी, (५) मांगी ही गावे नव्याने समाविष्ट करणेबाबत प्रस्तावित केले आहे.

उक्त वाचा क्रमांक ४ अन्वये दिलेल्या शक्तीस अधीन राहून सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद केलेप्रमाणे उपअधीक्षक, भूमी अभिलेख, करमाळा यांचे अधिनस्त सजा करमाळामध्ये मौजे (१) रोशेवाडी, (२) घारगाव, (३) हिवरवाडी, व सजा जेऊरमध्ये मौजे (१) जेऊरवाडी, (२) हिंगणी व सजा वीटमध्ये मौजे (१) खडकेवाडी, (२) धायखिंडी, (३) घरतवाडी, (४) वडाचीवाडी, (५) मांगी ही गावे नव्याने समाविष्ट करून त्यांचे कार्यक्षेत्रात बदल करणेत येऊन परिरक्षणास घेणेस एतद्वारे मंजुरी देणेत येत आहे.

परिशिष्ट - ब

इकडील अधिसूचना क्रमांक नगर भूमापन / गावठाण अधिसूचना / २०२४, दिनांक २५ जून २०२५ चे अधिसूचनेसोबतचे परिशिष्ट
नगर भूमापन योजनेअंतर्गत नव्याने परिरक्षणासाठी घेण्यात येणाऱ्या गावांचा / मिळकतींचा तपशील

जिल्हा सोलापूर, तालुका करमाळा, कार्यालयाचे नाव : उपअधीक्षक, भूमी अभिलेख, करमाळा

सध्या परिरक्षणास उपलब्ध पुनर्रचनेपूर्वी			परिरक्षणासाठी नव्याने घ्यावयाची गावे		पुनर्रचनेनंतरची स्थिती			शेरा
सजाचे नाव	गावाचे नाव	एकूण मिळकती	गावाचे नाव	एकूण मिळकती	सजाचे नाव	गावाचे नाव	एकूण मिळकती	
१	२	३	४	५	६	७	८	९
प. भू. करमाळा	करमाळा	६२८०	रोशेवाडी	९७	प. भू. करमाळा	करमाळा	६२८०	
	पांडे	५२४	घारगाव	१३५		पांडे	५२४	
	सालसे	४७८	हिवरवाडी	८५		सालसे	४७८	
	वरकुटे	५४८				वरकुटे	५४८	
	गुळसडी	१४०				गुळसडी	१४०	इकडील
	गौंडरे	१९२				गौंडरे	१९२	कार्यालयाकडील
	आळसुंदे	२८				आळसुंदे	२८	दि. ४ मार्च २०२४

परिशिष्ट--*चालू*

१	२	३	४	५	६	७	८	९
	खांबेवाडी	१६				खांबेवाडी	१६	रोजीचे आदेशान्वये अधिसूचना मंजूर.
	निलज	२०				निलज	२०	इकडील कार्या-
	पोटेगाव	६४				पोटेगाव	६४	कार्यालयाकडील
	बिटरगाव	११०				बिटरगाव	११०	दि. १५ जानेवारी
	तरटगाव	६०				तरटगाव	६०	२०२५ रोजीचे आदेशान्वये अधिसूचना मंजूर.
						रोशेवाडी	९७	नव्याने समाविष्ट
						घारगाव	१३५	नव्याने समाविष्ट
						हिवरवाडी	८५	नव्याने समाविष्ट
एकूण		**८४६०**		**३१७**			**८७७७**	
प. भू. जेऊर	जेऊर	७८२	जेऊरवाडी	३६	प. भू. जेऊर	जेऊर	७८२	
	केम	१५१२	हिंगणी	९९		केम	१५१२	
	निभोरे	५१८				निभोरे	५१८	
	घोटी	४३२				घोटी	४३२	
	वांगी १	६२४				वांगी १	६२४	
	वांगी २	२२४				वांगी २	२२४	
	वांगी ३	३५६				वांगी ३	३५६	
	चिखलठाण १	५६६				चिखलठाण १	५६६	
	चिखलठाण २	१४७				चिखलठाण २	१४७	
	कुंभेज	४६७				कुंभेज	४६७	
	साडे	८१६				साडे	८१६	
	कंदर	५८६				कंदर	५८६	
	मांजरगाव	१३६				मांजरगाव	१३६	इकडील कार्यालयाकडील दि. ४ मार्च २०२४ रोजीचे आदेशान्वये अधिसूचना मंजूर.
						जेऊरवाडी	३६	नव्याने समाविष्ट
						हिंगणी	९९	नव्याने समाविष्ट
एकूण		**७१६६**		**१३५**			**७३०१**	
प. भू. वीट	वीट	१११०	खडकेवाडी	४५	प. भू. वीट	वीट	१११०	
	कोर्टी	६१२	धायखिंडी	१४७		कोर्टी	६१२	
	सावडी	६२७	घरतवाडी	४७		सावडी	६२७	
	झरे	८७६	वडाचीवाडी	३६		झरे	८७६	
	देवळाली	३७७	मांगी	१८८		देवळाली	३७७	
	पोथरे	५३८				पोथरे	५३८	
	करंजे	३२२				करंजे	३२२	

परिशिष्ट--*चालू*

१	२	३	४	५	६	७	८	९
	रावगाव	६५२				रावगाव	६५२	
	राजुरी	४६५				राजुरी	४६५	
	जिंती	६७२				जिंती	६७२	
	केत्तूर १	२०४				केत्तूर १	२०४	
	केत्तूर २	५५१				केत्तूर २	५५१	
	आळजापूर	११३				आळजापूर	११३	इकडील
	कामोणे	७९				कामोणे	७९	कार्यालयाकडील
	कोळगाव	१२४				कोळगाव	१२४	दि. ४ मार्च २०२४ रोजीचे आदेशान्वये अधिसूचना मंजूर.
						खडकेवाडी	४५	नव्याने समाविष्ट
						धायखिंडी	१४७	नव्याने समाविष्ट
						घरतवाडी	४७	नव्याने समाविष्ट
						वडाचीवाडी	३६	नव्याने समाविष्ट
						मांगी	१८८	नव्याने समाविष्ट
एकूण		**७३२२**		**४६३**			**७७८५**	

सदर अधिसूचनेची अंमलबजावणी दिनांक २५ जून २०२५ पासून होणेची आहे.

दादासाहेब घोडके,
जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख,
सोलापूर.

सोलापूर, २५ जून २०२५.

वाचा : (१) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील निर्णय क्रमांक आस्थापना-१०९३/प्र. क्र. १९/ल-१, दिनांक १८ ऑगस्ट १९९४.

(२) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१३/मातंक, दिनांक २२ फेब्रुवारी २०१९.

(३) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे यांचेकडील अधिसूचना क्रमांक गावठाण/अधिसूचना/एस.व्ही.सी.आर.-४३२४/स-४/१९९४, पुणे, दिनांक २३ सप्टेंबर १९९४.

(४) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे यांचेकडील परिपत्रक क्रमांक गावठाण/ड्रोन सर्व्हे/प्र.क्र.३९/२०२१, दिनांक २५ जानेवारी २०२१.

(५) उपअधीक्षक, भूमी अभिलेख, करमाळा यांचेकडील पत्र जा. क्र. ५१०/न.भू./स्वा.प. प्रस्ताव/२५, दिनांक ४ जुलै २०२५.

अधिसूचना

क्रमांक न.भू.शि./गाव.अधि.मं./कावि-१७६/२६३५/२०२५.— महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील निर्णय क्रमांक आस्थापना-१०९३/प्र.क्र.१९/ल-१, दिनांक १८ ऑगस्ट १९९४ चे शासन निर्णयानुसार भूमी अभिलेख विभागाची तालुका स्तरावर पुनर्रचना करणेत आलेली आहे, त्याअनुषंगाने जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे यांचेकडील अधिसूचना क्रमांक एस.व्ही.सी.आर.-४३२४/स-४/१९९४, दिनांक २३ सप्टेंबर १९९४ अन्वये पुणे विभागातील सजांची पुनर्रचना करणेत आली असून सजांची गावे व मिळकती कायम करणेत आलेल्या आहेत.

महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१३/मातंक, दिनांक २२ फेब्रुवारी २०१९ अन्वये राज्यात जमाबंदी प्रकल्प राबविण्यास मान्यता दिली आहे.

उपअधीक्षक, भूमी अभिलेख, करमाळा यांनी त्यांचेकडील प्रस्तावामध्ये त्यांचे अधिनस्त सजा जेऊरमध्ये मौजे (१) मलवडी, (२) सर्पडोह, (३) भाळवणी, (४) शेटफळ ही गावे नव्याने समाविष्ट करणेबाबत प्रस्तावित केले आहे.

उक्त वाचा क्रमांक ४ अन्वये दिलेल्या शक्तीस अधीन राहून सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद केलेप्रमाणे उपअधीक्षक, भूमी अभिलेख, करमाळा यांचे अधिनस्त सजा जेऊरमध्ये मौजे (१) मलवडी, (२) सर्पडोह, (३) भाळवणी, (४) शेटफळ ही गावे नव्याने समाविष्ट करून त्यांचे कार्यक्षेत्रात बदल करणेत येऊन परिरक्षणास घेणेस एतद्वारे मंजुरी देणेत येत आहे.

परिशिष्ट - ब

इकडील अधिसूचना क्रमांक नगर भूमापन / गावठाण अधिसूचना / २०२५, दिनांक ७ जुलै २०२५ चे अधिसूचनेसोबतचे परिशिष्ट
नगर भूमापन योजनेअंतर्गत नव्याने परिरक्षणासाठी घेण्यात येणाऱ्या गावांचा / मिळकतींचा तपशील

जिल्हा सोलापूर, तालुका करमाळा, कार्यालयाचे नाव : उपअधीक्षक, भूमी अभिलेख, करमाळा

सध्या परिरक्षणास उपलब्ध पुनर्रचनेपूर्वी			परिरक्षणासाठी नव्याने घ्यावयाची गावे		पुनर्रचनेनंतरची स्थिती			शेरा
सजाचे नाव	गावाचे नाव	एकूण मिळकती	गावाचे नाव	एकूण मिळकती	सजाचे नाव	गावाचे नाव	एकूण मिळकती	
१	२	३	४	५	६	७	८	९
प. भू. जेऊर	जेऊर	७८२	मलवडी	८९	प. भू. जेऊर	जेऊर	७८२	
	केम	१५१२	सर्पडोह	७७		केम	१५१२	
	निभोरे	५१८	भाळवणी	१२५		निभोरे	५१८	
	घोटी	४३२	शेटफळ	२२०		घोटी	४३२	
	वांगी १	६२४				वांगी १	६२४	
	वांगी २	२२४				वांगी २	२२४	
	वांगी ३	३५६				वांगी ३	३५६	
	चिखलठाण १	५६६				चिखलठाण १	५६६	
	चिखलठाण २	१४७				चिखलठाण २	१४७	
	कुंभेज	४६७				कुंभेज	४६७	
	साडे	८१६				साडे	८१६	
	कंदर	५८६				कंदर	५८६	
	मांजरगाव	१३६				मांजरगाव	१३६	इकडील कार्यालयाकडील दि. ४ मार्च २०२४ रोजीचे आदेशान्वये अधिसूचना मंजूर.
						जेऊरवाडी	३६	अधिसूचना मंजूर दि. २५ जून २०२५.
						हिंगणी	९९	
						मलवडी	८९	नव्याने समाविष्ट
						सर्पडोह	७७	नव्याने समाविष्ट
						भाळवणी	१२५	नव्याने समाविष्ट
						शेटफळ	२२०	नव्याने समाविष्ट
एकूण		**७३०१**		**५११**			**७८१२**	

सदर अधिसूचनेची अंमलबजावणी दिनांक ७ जुलै २०२५ पासून होणेची आहे.

दादासाहेब घोडके,
जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख,
सोलापूर.

सोलापूर, ७ जुलै २०२५.

वाचा : (१) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील निर्णय क्रमांक आस्थापना-१०९३/प्र. क्र. १९/ल-१, दिनांक १८ ऑगस्ट १९९४.

(२) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१३/मातंक, दिनांक २२ फेब्रुवारी २०१९.

(३) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे यांचेकडील अधिसूचना क्रमांक गावठाण/अधिसूचना/एस.व्ही.सी.आर.-४३२४/स-४/१९९४, पुणे, दिनांक २३ सप्टेंबर १९९४.

(४) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे यांचेकडील परिपत्रक क्रमांक गावठाण/ड्रोन सर्व्हे/प्र.क्र.३९/२०२१, दिनांक २५ जानेवारी २०२१.

(५) उपअधीक्षक, भूमी अभिलेख, माढा यांचेकडील पत्र जा. क्रमांक १०७६/न.भू./परिरक्षण प्रस्ताव/ड्रोन, दिनांक २५ जून २०२५.

अधिसूचना

क्रमांक न.भू.शि./कावि-१६१/गाव अधि./२५५१/२०२५.— महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील निर्णय क्रमांक आस्थापना-१०९३/प्र.क्र.१९/ल-१, दिनांक १८ ऑगस्ट १९९४ चे शासन निर्णयानुसार भूमी अभिलेख विभागाची तालुका स्तरावर पुनर्रचना करणेत आलेली आहे, त्याअनुषंगाने जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे यांचेकडील अधिसूचना क्रमांक एस.व्ही.सी.आर.-४३२४/स-४/१९९४, दिनांक २३ सप्टेंबर १९९४ अन्वये पुणे विभागातील सजांची पुनर्रचना करणेत आली असून सजांची गावे व मिळकती कायम करणेत आलेल्या आहेत.

महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१३/मातंक, दिनांक २२ फेब्रुवारी २०१९ अन्वये राज्यात जमाबंदी प्रकल्प राबविण्यास मान्यता दिली आहे.

उपअधीक्षक, भूमी अभिलेख, माढा यांनी त्यांचेकडील प्रस्तावामध्ये त्यांचे अधिनस्त सजा माढामध्ये मौजे (१) जामगाव, (२) केवड, (३) उंदरगाव ही गावे व सजा कुर्डुवाडीमध्ये मौजे (१) लोणी, (२) मुंगशी, (३) नाडी ही गावे व सजा टेंभुर्णीमध्ये (१) मिटकलवाडी, (२) माळेगाव ही गावे व सजा मोडनिंबमध्ये (१) बैरागवाडी, (२) जाधववाडी मो. ही गावे नव्याने समाविष्ट करणेबाबत प्रस्तावित केले आहे.

उक्त वाचा क्रमांक ४ अन्वये दिलेल्या शक्तीस अधीन राहून सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद केलेप्रमाणे उपअधीक्षक, भूमी अभिलेख, माढा यांचे अधिनस्त सजा माढामध्ये मौजे (१) जामगाव, (२) केवड, (३) उंदरगाव ही गावे व सजा कुर्डुवाडीमध्ये मौजे (१) लोणी, (२) मुंगशी, (३) नाडी ही गावे व सजा टेंभुर्णीमध्ये (१) मिटकलवाडी, (२) माळेगाव ही गावे व सजा मोडनिंबमध्ये (१) बैरागवाडी, (२) जाधववाडी मो. ही गावे नव्याने समाविष्ट करून त्यांचे कार्यक्षेत्रात बदल करणेत येऊन परिरक्षणास घेणेस एतद्वारे मंजुरी देणेत येत आहे.

परिशिष्ट - ब

इकडील अधिसूचना क्रमांक नगर भूमापन / गावठाण अधिसूचना / २०२५, दिनांक ३० जून २०२५ चे अधिसूचनेसोबतचे परिशिष्ट

नगर भूमापन योजनेअंतर्गत नव्याने परिरक्षणासाठी घेण्यात येणाऱ्या गावांचा / मिळकतींचा तपशील

जिल्हा सोलापूर, तालुका माढा, कार्यालयाचे नाव : उपअधीक्षक, भूमी अभिलेख, माढा

सध्या परिरक्षणासाठी उपलब्ध पुनर्रचनेपूर्वी			परिरक्षणास नव्याने घ्यावयाची गावे		पुनर्रचनेनंतरची स्थिती			शेरा
सजाचे नाव	गावाचे नाव	एकूण मिळकती	गावाचे नाव	एकूण मिळकती	सजाचे नाव	गावाचे नाव	एकूण मिळकती	
१	२	३	४	५	६	७	८	९
प.भू. माढा	माढा	२०६३	जामगाव	१४३	प. भू. माढा	माढा	२०६३	
	अंजनगाव (खे.)	९४६	केवड	४४३		अंजनगाव (खे.)	९४६	
	अंजनगाव (उ.)	६४२	उंदरगाव	४८९		अंजनगाव (उ.)	६४२	
	उपळाई खुर्द	८५०				उपळाई खुर्द	८५०	
	दारफळ	७९३				दारफळ	७९३	
	वाकाव	५११				वाकाव	५११	
	मानेगाव	९२७				मानेगाव	९२७	
	वडशिंगे	६००				वडशिंगे	६००	

परिशिष्ट--*चालू*

१	२	३	४	५	६	७	८	९
	म्हैसगाव	८४०				म्हैसगाव	८४०	
	विठ्ठलवाडी	१९३				विठ्ठलवाडी	१९३	अधिसूचना मंजूर दि. १५ ऑक्टोबर २०२४.
	वेताळवाडी	८५				वेताळवाडी	८५	अधिसूचना मंजूर दि. १ एप्रिल २५.
						जामगाव	१४३	नव्याने समाविष्ट
						केवड	४४३	नव्याने समाविष्ट
						उंदरगाव	४८९	नव्याने समाविष्ट
एकूण बेरीज		**८४५०**		**१०७५**			**९५२५**	
प. भू. कुर्डूवाडी	कुर्डूवाडी	३९८६	लोणी	७९	प. भू. कुर्डूवाडी	कुर्डूवाडी	३९८६	
	कुर्डू	९७६	मुंगशी	२००		कुर्डू	९७६	
	पिंपळखुंटे	५३३	नाडी	१०६		पिंपळखुंटे	५३३	
	भोसरे	५९८				भोसरे	५९८	
	बारलोणी	५३७				बारलोणी	५३७	
	अकुलगाव	३५०				अकुलगाव	३५०	
	कव्हे	९३६				कव्हे	९३६	
	रोपळे	८२१				रोपळे	८२१	
	ढवळस	१८४				ढवळस	१८४	अधिसूचना मंजूर
	गवळेवाडी	३४				गवळेवाडी	३४	दि. १ एप्रिल २५.
						लोणी	७९	नव्याने समाविष्ट
						मुंगशी	२००	नव्याने समाविष्ट
						नाडी	१०६	नव्याने समाविष्ट
एकूण बेरीज		**८९५५**		**३८५**			**९३४०**	
प. भू. टेंभुर्णी	टेंभुर्णी	१५६४	मिटकलवाडी	१४१	प. भू. टेंभुर्णी	टेंभुर्णी	१५६४	
	परिते	८३८	माळेगाव	१७५		परिते	८३८	
	पिंपळनेर	८०१				पिंपळनेर	८०१	
	घोटी	५४९				घोटी	५४९	
	बेंबळे	८७५				बेंबळे	८७५	
	बादलेवाडी	२३६				बादलेवाडी	२३६	
	निमगाव टें.	५३८				निमगाव टें.	५३८	
	भुईंजे	१०३				भुईंजे	१०३	अधिसूचना मंजूर दि. १५ ऑक्टोबर २०२४.

परिशिष्ट--*चालू*

१	२	३	४	५	६	७	८	९
	अकुंभे	१६८				अकुंभे	१६८	अधिसूचना मंजूर दि. १ एप्रिल २५.
						मिटकलवाडी	१४१	नव्याने समाविष्ट
						माळेगाव	१७५	नव्याने समाविष्ट
एकूण बेरीज		**५६७२**		**३१६**			**५९८८**	
प. भू. मोडनिंब	मोडनिंब	१५७०	बैरागवाडी	१७०	प. भू. मोडनिंब	मोडनिंब	१५७०	
	अरण	७०४	जाधववाडी मो.	१५३		अरण	७०४	
	उपळाई बु.	९८८				उपळाई बु.	९८८	
	भुताष्टे	६१०				भुताष्टे	६१०	
	बावी	५१४				बावी	५१४	
	सोलंकरवाडी	१३६				सोलंकरवाडी	१३६	
	तुळशी	४६१				तुळशी	४६१	
	लऊळ	११२९				लऊळ	११२९	
	पडसाळी	९६				पडसाळी	९६	अधिसूचना मंजूर दि. १ एप्रिल २५.
						बैरागवाडी	१७०	नव्याने समाविष्ट
						जाधववाडी मो.	१५३	नव्याने समाविष्ट
एकूण बेरीज		**६२०८**		**३२३**			**६५३१**	

सदर अधिसूचनेची अंमलबजावणी दिनांक ३० जून २०२५ पासून होणेची आहे.

दादासाहेब घोडके,

जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख,

सोलापूर, ३० जून २०२५. सोलापूर.

वाचा : (१) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील निर्णय क्रमांक आस्थापना-१०९३/प्र. क्र. १९/ल-१, दिनांक १८ ऑगस्ट १९९४.

(२) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१३/मातंक, दिनांक २२ फेब्रुवारी २०१९.

(३) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे यांचेकडील अधिसूचना क्रमांक गावठाण/अधिसूचना/एस.व्ही.सी.आर.-४३२४/स-४/१९९४, पुणे, दिनांक २३ सप्टेंबर १९९४.

(४) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे यांचेकडील परिपत्रक क्रमांक गावठाण/ड्रोन सर्व्हे/प्र.क्र.३९/२०२१, दिनांक २५ जानेवारी २०२१.

(५) उपअधीक्षक, भूमी अभिलेख, अक्कलकोट यांचेकडील पत्र जा. क्रमांक ७२०/न.भू.शि./ड्रोन स./परिरक्षण प्रस्ताव/२५, दिनांक २६ जुलै २०२५.

अधिसूचना

क्रमांक न.भू.शि./गा.अ.मं./कावि-१६२/२६३३/२०२५.— महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील निर्णय क्रमांक आस्थापना-१०९३/प्र.क्र.१९/ल-१, दिनांक १८ ऑगस्ट १९९४ चे शासन निर्णयानुसार भूमी अभिलेख विभागाची तालुका स्तरावर पुनर्रचना करणेत आलेली आहे, त्याअनुषंगाने जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे यांचेकडील अधिसूचना क्रमांक एस.व्ही.सी.आर.-४३२४/स-४/१९९४, दिनांक २३ सप्टेंबर १९९४ अन्वये पुणे विभागातील सजांची पुनर्रचना करणेत आली असून सजांची गावे व मिळकती कायम करणेत आलेल्या आहेत.

महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१३/मातंक, दिनांक २२ फेब्रुवारी २०१९ अन्वये राज्यात जमाबंदी प्रकल्प राबविण्यास मान्यता दिली आहे.

उपअधीक्षक, भूमी अभिलेख, अक्कलकोट यांनी त्यांचेकडील प्रस्तावामध्ये त्यांचे अधिनस्त सजा अक्कलकोटमध्ये मौजे (१) निमगाव, (२) नागनहळ्ळी, (३) ममदाबाद व सजा वागदरीमध्ये मौजे (१) हालहळ्ळी, (२) मोट्याळ, (३) गोगाव व सजा कडबगावमध्ये मौजे (१) भोसगी व सजा करजगीमध्ये मौजे (१) चिंचोळी नजीक, (२) गुड्डेवाडी, (३) कर्जाळ ही गावे नव्याने समाविष्ट करणेबाबत प्रस्तावित केले आहे.

उक्त वाचा क्रमांक ४ अन्वये दिलेल्या शक्तीस अधीन राहून सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद केलेप्रमाणे उपअधीक्षक, भूमी अभिलेख, माढा यांचे अधिनस्त सजा अक्कलकोटमध्ये मौजे (१) निंमगाव, (२) नागनहळ्ळी, (३) ममदाबाद व सजा वागदरीमध्ये मौजे (१) हालहळ्ळी, (२) मोट्याळ, (३) गोगाव व सजा कडबगावमध्ये मौजे (१) भोसगी व सजा करजगीमध्ये मौजे (१) चिंचोळी नजीक, (२) गुड्डेवाडी, (३) कर्जाळ ही गावे नव्याने समाविष्ट करून त्यांचे कार्यक्षेत्रात बदल करणेत येऊन परिरक्षणास घेणेस एतद्वारे मंजुरी देणेत येत आहे.

परिशिष्ट - ब

इकडील अधिसूचना क्रमांक नगर भूमापन / गावठाण अधिसूचना / २०२५, दिनांक ७ जुलै २०२५ चे अधिसूचनेसोबतचे परिशिष्ट

नगर भूमापन योजनेअंतर्गत नव्याने परिरक्षणासाठी घेण्यात येणाऱ्या गावांचा / मिळकतींचा तपशील

जिल्हा सोलापूर, तालुका अक्कलकोट, कार्यालयाचे नाव : उपअधीक्षक, भूमी अभिलेख, अक्कलकोट

सध्या परिरक्षणासाठी उपलब्ध पुनर्रचनेपूर्वी			परिरक्षणास नव्याने घ्यावयाची गावे		पुनर्रचनेनंतरची स्थिती			शेरा
सजाचे नाव	गावाचे नाव	एकूण मिळकती	गावाचे नाव	एकूण मिळकती	सजाचे नाव	गावाचे नाव	एकूण मिळकती	
१	२	३	४	५	६	७	८	९
प. भू. अक्कलकोट.	अक्कलकोट	३९११	निंमगाव	१७४	प. भू. अक्कलकोट.	अक्कलकोट	३९९१	
	मैंदर्गी	२७१२	नागनहळ्ळी	१५१		मैंदर्गी	२७१२	
			ममदाबाद	७८		निंमगाव	१७४	नव्याने समाविष्ट
						नागनहळ्ळी	१५१	नव्याने समाविष्ट
						ममदाबाद	७८	नव्याने समाविष्ट
एकूण बेरीज		**६७०३**		**४०३**			**७१०६**	
प. भू. वागदरी	वागदरी	१२९०	हालहळ्ळी अ.	१६४	प. भू. वागदरी	वागदरी	१२९०	
	शिरवळ	१२०९	मोट्याळ	२३४		शिरवळ	१२०९	
	किणी	९४४	गोगाव	३३९		किणी	९४४	
	सलगर	१२७८				सलगर	१२७८	
	बादोले बु.	६१९				बादोले बु.	६१९	
	बोरगाव दे.	८१९				बोरगाव दे.	८१९	
						हालहळ्ळी अ.	१६४	नव्याने समाविष्ट
						मोट्याळ	२३४	नव्याने समाविष्ट
						गोगाव	३३९	नव्याने समाविष्ट
एकूण बेरीज		**६१५९**		**७३७**			**६८९६**	

परिशिष्ट--*चालू*

१	२	३	४	५	६	७	८	९
प. भू. कडबगाव	कडबगाव	४९१	भोसगी	२४२	प. भू. कडबगाव	कडबगाव	४९१	
	गौडगाव बु.	४३१				गौडगाव बु.	४३१	
	नाविंदगी	४२०				नाविंदगी	४२०	
	तोळणूर	७३९				तोळणूर	७३९	
	नागणसूर	१५३६				नागणसूर	१५३६	
	हैद्रा	५५१				हैद्रा	५५१	
	उडगी	६९४				उडगी	६९४	
	चप्पळगाव	९२८				चप्पळगाव	९२८	
	दहिटणे	५९२				दहिटणे	५९२	
						भोसगी	२४२	नव्याने समाविष्ट
एकूण बेरीज		**६३८२**		**२४२**			**६६२४**	
प. भू. करजगी	करजगी	१३४६	चिंचोळी न.	२३२	प. भू. करजगी	करजगी	१३४६	
	पानमंगरूळ	१२२८	गुड्डेवाडी	३४७		पानमंगरूळ	१२२८	
	जेऊर	१२९७	कर्जाळ	५०४		जेऊर	१२९७	
	सुलेरजवळगे	५८०				सुलेरजवळगे	५८०	
	हंजगी	३३९				हंजगी	३३९	
	तडवळ	५५२				तडवळ	५५२	
						चिंचोळी न.	२३२	नव्याने समाविष्ट
						गुड्डेवाडी	३४७	नव्याने समाविष्ट
						कर्जाळ	५०४	नव्याने समाविष्ट
एकूण बेरीज		**५३४२**		**१०८३**			**६४२५**	

सदर अधिसूचनेची अंमलबजावणी दिनांक ७ जुलै २०२५ पासून होणेची आहे.

दादासाहेब घोडके,
जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख,
सोलापूर.

सोलापूर, ७ जुलै २०२५.

वाचा : (१) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय, क्रमांक आस्थापना-१०९३/प्र. क्र. १९/ल-१, दिनांक १८ ऑगस्ट १९९४.

(२) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१३/मातंक, दिनांक २२ फेब्रुवारी २०१९.

(३) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे यांचेकडील अधिसूचना क्रमांक गावठाण/अधिसूचना/एस.व्ही.सी.आर.-४३२४/स-४/१९९४, पुणे, दिनांक २३ सप्टेंबर १९९४.

(४) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे यांचेकडील परिपत्रक क्रमांक गावठाण ड्रोन सर्व्हे/प्र.क्र. ३९/२०२१, दिनांक २५ जानेवारी २०२१.

(५) उपअधीक्षक, भूमी अभिलेख, बार्शी यांचेकडील पत्र क्रमांक ना.भू./स्वामित्व/परि.प्रस्ताव/२५, दिनांक १ जुलै २०२५.

अधिसूचना

क्रमांक न.भू.शि./गा.अ.मं./कावि-१६८/२६३४/२०२५.— महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक आस्थापना-१०९३/प्र. क्र. १९/ल-१, दिनांक १८ ऑगस्ट १९९४ चे शासन निर्णयानुसार भूमी अभिलेख विभागाची तालुका स्तरावर पुनर्रचना करणेत आलेली आहे. त्या अनुषंगाने मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे या कार्यालयाकडील अधिसूचना क्रमांक एस.व्ही.सी.आर.-

४३२४/स-४/१९९४, पुणे, दिनांक २३ सप्टेंबर १९९४ अन्वये पुणे विभागातील सजांची पुनर्रचना करणेत आली असून सजांची गावे व मिळकती कायम करणेत आलेल्या आहेत.

महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१३/मातंक, दिनांक २२ फेब्रुवारी २०१९ अन्वये राज्यात जमाबंदी प्रकल्प राबविण्यास मान्यता दिली आहे.

उपअधीक्षक, भूमी अभिलेख, बार्शी यांनी त्यांचेकडील प्रस्तावामध्ये त्यांचे अधिनस्त सजा पानगावमध्ये मौजे (१) कळंबवाडी (पा.), (२) भोईंजे व सजा उपळे दुमालामध्ये मौजे (१) रूई, (२) झरेगाव व सजा बार्शीमध्ये मौजे (१) कासारवाडी, (२) नागोबाचीवाडी ही गावे नव्याने समाविष्ट करणेबाबत प्रस्तावित केले आहे.

उक्त वाचा क्रमांक ४ अन्वये दिलेल्या शक्तीस अधीन राहून सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उपअधीक्षक, भूमी अभिलेख, बार्शी यांचे अधिनस्त सजा पानगावमध्ये मौजे (१) कळंबवाडी (पा.), (२) भोईंजे व सजा उपळे दुमालामध्ये मौजे (१) रूई, (२) झरेगाव व सजा बार्शीमध्ये मौजे (१) कासारवाडी, (२) नागोबाचीवाडी ही गावे नव्याने समाविष्ट करून त्यांचे कार्यक्षेत्रात बदल करणेत येऊन परिरक्षणास घेणेस एतद्वारे मंजुरी देणेत येत आहे.

परिशिष्ट - ब

इकडील अधिसूचना क्रमांक नगर भूमापन/गावठाण अधिसूचना/२०२५, दिनांक ७ जुलै २०२५ चे अधिसूचने सोबतचे परिशिष्ट

नगर भूमापन योजनेअंतर्गत नव्याने परिरक्षणासाठी घेण्यात येणाऱ्या गावांचा/मिळकतींचा तपशील

जिल्हा सोलापूर, तालुका बार्शी, कार्यालयाचे नाव : उपअधीक्षक, भूमी अभिलेख, बार्शी

सध्या परिरक्षणासाठी उपलब्ध पुनर्रचनेपूर्वी			परिरक्षणासाठी नव्याने घ्यावयाची गावे		पुनर्रचनेनंतरची स्थिती			शेरा
सजा	गावे	मिळकती	गाव	मिळकती	सजा	गावे	मिळकती	
१	२	३	४	५	६	७	८	९
प.भू. पानगाव	पानगाव	१७९३	कळंबवाडी (पा.)	८२	प.भू. पानगाव	पानगाव	१७९३	
	बावी	९३१	भोईंजे	३८१		बावी	९३१	
	श्रीपत पिंपरी	९६५				श्रीपत पिंपरी	९६५	
	कोरफळे	९६५				कोरफळे	९६५	
	साकत	८५३				साकत	८५३	
	सौंदरे	६४०				सौंदरे	६४०	
	पिंपरी पा.	५२९				पिंपरी पा.	५२९	
	शेळगाव मा.	२८५				शेळगाव मा.	२८५	अधिसूचना मंजूर
	कव्हे	२१५				कव्हे	२१५	दि. २८ ऑक्टोबर २०२४.
	अलिपूर	११३				अलिपूर	११३	अधिसूचना मंजूर दि. १४ नोव्हेंबर २०२४.
	काळेगाव	२८०				काळेगाव	२८०	अधिसूचना मंजूर दि. २ एप्रिल २५.
	दडशिंगे	२०९				दडशिंगे	२०९	अधिसूचना मंजूर दि. १० जून २५.
						कळंबवाडी (पा.)	८२	नव्याने समाविष्ट
						भोईंजे	३८१	नव्याने समाविष्ट
एकूण बेरीज		**७७७८**		**४६३**			**८२४१**	

परिशिष्ट--*चालू*

१	२	३	४	५	६	७	८	९
प.भू. उपळे दुमाला.	उपळे दुमाला	१३६०	रूई	३५६	प.भू. उपळे दुमाला.	उपळे दुमाला	१३६०	
	गौंडगाव	८६९	झरेगाव	१९१		गौंडगाव	८६९	
	नारी	८०१				नारी	८०१	
	भातंबरे	८५९				भातंबरे	८५९	
	मळेगाव	७४०				मळेगाव	७४०	
	चिखर्डे	८४४				चिखर्डे	८४४	
	संगमनेर	१३५				संगमनेर	१३५	अधिसूचना मंजूर
	आळजापूर	१८६				आळजापूर	१८६	दि. २८ ऑक्टोबर २०२४.
	मुंगशी (आर)	१४१				मुंगशी (आर)	१४१	अधिसूचना मंजूर
	कासारी	२२२				कासारी	२२२	दि. १० जून २५.
	सावरगाव	२६६				सावरगाव	२६६	
	जामगाव पा.	३२८				जामगाव पा.	३२८	अधिसूचना मंजूर दि. ३० जून २५.
						रूई	३५६	नव्याने समाविष्ट
						झरेगाव	१९१	नव्याने समाविष्ट
एकूण बेरीज		**६७५१**		**५४७**			**७२९८**	
प.भू. बार्शी	बार्शी	१३४२२	कासारवाडी	१४१	प.भू. बार्शी	बार्शी	१३४२२	
	अरणगाव	१४५	नागोबाचीवाडी	११९		अरणगाव	१४५	अधिसूचना मंजूर
	कांदलगाव	२०७	खडकलगाव	१४१		कांदलगाव	२०७	दि. १० जून २५.
	खडकलगाव	१४१				खडकलगाव	१४१	
						कासारवाडी	१४१	नव्याने समाविष्ट
						नागोबाचीवाडी	११९	नव्याने समाविष्ट
एकूण बेरीज		**१३९१५**		**२६०**			**१४१७५**	

सदर अधिसूचनेची अंमलबजावणी दिनांक ७ जुलै २०२५ पासून होणेची आहे.

दादासाहेब घोडके,

जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख,

सोलापूर.

सोलापूर, ७ जुलै २०२५.

अपर निबंधक, सहकारी संस्था यांजकडून

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये

आदेश

क्रमांक ना.बँका/१-सआ/विद्या बँक/का.क.-१५६/११३४/२०२५.—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी, मिलिंद आकरे, अपर निबंधक (तपासणी व निवडणूक) सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे या आदेशान्वये विद्या सहकारी बँक लि., पुणे या बँकेच्या खालील अधिकाऱ्यांना त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी कलम ९८ व कलम १०१ अन्वये प्राप्त झालेल्या वसुली प्रमाणपत्रांची अंमलबजावणीबाबत करावयाच्या कार्यवाहीपुरती महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये व नियम, १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदींनुसार खालील अटींस अधीन राहून या आदेशाच्या दिनांकापासून ते ३१ मार्च २०२६ पर्यंत शक्ती प्रदान करीत आहे.

परिशिष्ट

अ.क्र.	अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्यांचे नाव	अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्यांचा हुद्दा	शक्तीची व्याप्ती	कार्यक्षेत्र जिल्हा
१	२	३	४	५
१.	श्री. गणेश ईश्वरलाल निम्हण	वसुली विभाग प्रमुख	वसुली अधिकारी	महाराष्ट्र राज्य
२.	श्री. सुनील दत्तात्रय रेळेकर	विशेष कार्यासन अधिकारी	वसुली अधिकारी	महाराष्ट्र राज्य
३.	श्री. कार्तिक नारायण अय्यर	कनिष्ठ अधिकारी	वसुली अधिकारी	पुणे जिल्हा
४.	श्री. रवींद्र शंकर गोसावी	कनिष्ठ अधिकारी	वसुली अधिकारी	पुणे जिल्हा

अटी.—

